# श्री साईलीला



दासगणूंना पांडुरंगस्वरूपात बाबांचे दर्शन

फेब्रुवारी

६० पैसे

१९७५

# अनुक्रमणिका – फेब्रुवारी १९७५


| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय | श्रीसाईलीला लेखक - कवी प्रथम स्नेहसंमेलन |
| २. | थोर संत श्री मेहेरबाबा | श्री साईनंद |
| ३. | क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे | डॉ. शां. ना. टिपणीस |
| ४. | वरळीचे श्रीसाईनाथ मंदिर | सदानंद चेंदवणकर |
| ५. | प्रचिती | सौ. उषा प्रभाकर मुळे |
| ६. | आमचे श्री साईबाबा व त्यांची कृपा | श्री. दिनकर डी. सपकाळ |
| ७. | सुखी जीवनाची चिंतनिका | श्री. बाळकृष्ण धामणकर |
| ८. | श्रीसाईनाथ चरित्र | श्री. र. श्री. पुजारी |
| ९. | श्रीसाई बोधामृत-अर्वाचीन भक्तलीलामृत अ. ३१ | श्री. द. शं. टिपणीस |
| १०. | ज्योतिष शास्त्राचा आनामा | होरालंकार शं. बा. देवधर |
| ११. | तूच तूच हे जडो वेड | श्री. नरेंद्रकृष्ण ( सहस्रबुद्धे ) |
| १२. | श्रीसाई स्मरण | श्रीमती विमलादेवी |
| १३. | पंढरीचा पाटील | श्री. रमाकांत सरमळकर |
| १४. | झाले गेले जा विसरून | विनायक पाठक |
| १५. | देई दर्शन देवा | राधाकृष्ण गुप्ता 'चेतन' |
| १६. | नाम मात्र प्रभुरायाचे | लक्ष्मीतनया |
| १७. | श्रीसाई दरबारच्या शिल्पकारास वंदन | सई मुकुंद गर्दे |
| १८. | सारथी | श्री. जयंत भिडे |
| १९. | अवतरले साईनाथ सदनी | श्री. दत्ताराम बारस्कर |
| २०. | शिर्डीवृत्त | —— |

जगा लावावे सत्पथीं । हेचि साईलीलेची कृति ॥



# श्री सा ई वा क्सु धा

प्रकाश आणि अंधःकार । जैसे अन्योन्यव्यावृत्याकार ।
भिन्नरूप तें परस्पर । श्रेय – प्रेय तयापरी ॥ २ ॥
प्रेयार्थ जयाचें मन धांवे । स्वार्थापासाव तो भ्रंश पावे ।
श्रेय तें विवेकरूप आहे । अविवेकरूप प्रेय कीं ॥ ३ ॥
श्रेयाचा विषय केवळ विद्या । प्रेयाचा तो निखळ अविद्या ।
प्रेय कधीं ना भुलवी सुज्ञां । श्रेय अज्ञां नावडे ॥ ४ ॥
जोंवरी कनक – कामिनी होड । इंद्रियांसी विषयांची आवड ।
विवेक – वैराग्या नाहीं जोड । प्रेयचि गोड तोंवरी ॥ ५ ॥
नीर क्षीराची मिसळ । तेवीं प्रेय श्रेयांची भेसळ ।
जेवीं दुग्ध तेवढें निवळ । सेविती मराळ मानसीं ॥ ६ ॥

श्रीसाईसच्चरित – अध्याय १७ वा

---


## श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] फेब्रुवारी १९७५ [ अंक ११

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, एम्. ए. पी. एच्डी., रा. भा. प्रवीण
- श्री. सदानंद चेंदवणकर, बी. एस्सी., एस. टी. सी., रा. भा. प्रवीण

वार्षिक वर्गणी रु. ६–०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक रु. ०–६० फक्त.

*

: कार्यालय :
" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पीन : ४०००१४ दूरध्वनी : ४४३३६१

संपादकीय

# श्रीसाईलीला लेखक-कवींचे प्रथम संमेलन

पूर्वी जाहिर केल्याप्रमाणे श्रीसाईलीला मासिकाच्या लेखक-कवींचे प्रथम स्नेह-
संमेलन शिर्डी क्षेत्री शनिवार दिनांक १८ व रविवार दिनांक १९ जानेवारी १९७५
रोजी भरविण्यात आले होते. श्रीसाईलीलेला यंदा त्रेपन्न वर्षे पूर्ण होत आहेत व या
एवढ्या प्रदीर्घ कालावधीत प्रथमच हे असे संमेलन भरविण्यात आले ही विशेष उल्लेख
करण्यासारखी गोष्ट होय.

साईलीलेला आतापर्यंत अनेक लहानमोठ्या अबालवृद्ध स्त्री-पुरुष लेखक लेखिका
कवी-कवयित्री यांचे लेखन सहाय्य लाभलेले आहे व लाभत आहे. पण या लेखक
लेखिका कोण आहेत, यांचे उद्योग-व्यवसाय व्याप काय आहेत, साईलीलेला त्यांचे-
बद्दल काय वाटते, साईलीलेची प्रगती कशी करता येईल इ० अनेक हेतूने, जाणून
घेण्याच्या उद्देशाने, लेखक वर्गांचा परस्पर परिचय करून घेण्याच्या इच्छेने हे साईभक्त
लेखक कवींचे संमेलन भरविण्यात आले होते व सांगायला मोठा संतोष वाटतो
हे संमेलन कमालीचे यशस्वी झाले.

या संमेलनासाठी ग्वाल्हेर, पुणे, मालेगाव, मुंबई, अहमदाबाद येथून लेखक कवी
अशी सुमारे पन्नासावर भक्तमंडळी हजर होती. विशेष उल्लेखनीय म्हणजे पुण्याचे
पंचाहत्तरी गाठलेले वयोवृद्ध साईभक्त श्री. नारायण पुरुषोत्तम उर्फ काकासाहेब अवस्थी
मोठ्या उत्साहाने हजर होते. ठिकठिकाणहून आलेल्या मान्यवर मंडळीत पुण्याचे
संस्कृतचे माजी प्राध्यापक श्री. नारायणराव गोरे, शिक्षणशास्त्राचे प्राध्यापक श्री. र.
श्री. पुजारी, शिर्डीसंस्थानचे माजी अध्यक्ष डॉ. के. भ. गव्हाणकर, विख्यात गायक
श्री. श्रीराम सातर्डेकर, एल. आय सी.चे एक ब्रँच मॅनेजर श्री. सी. डी सामंत, होराल-
कार, शं. बा. देवधर, श्री. बा. सी. धामणकर, ग्वाल्हेरचे श्री. दिनकरराव सपकाळ,
व त्यांचे चिरंजीव, मुंबईचे श्री. व सौ वासुदेवराव सकपाळ, श्री. प्रकाशभाई दोशी, श्री.
नंदवाणी, श्री. व सौ, एम. डी. नायर, श्री. रघुनाथराव सांडभोर, मालेगावच्या सौ.
सुशिलाबाई हजारे, सौ. शकुंतला पाटील व मुंबईच्या सौ. कलावती चव्हाण व त्यांचे
पती श्री. वसंतराव चव्हाण, सौ. उषा मुळे, महाराष्ट्र हौसिंग बोर्डाचे जनता संपर्क
अधिकारी श्री. अरुण निगुडकर, साईलीलेच्या इंग्रजी आवृत्तीचे संपादक डॉ. श्री.
दि. परचुरे व सौ. आशाताई परचुरे, श्री मोरे इ. वडीमंडळी उपस्थित होती.

संमेलनाची पहिली बैठक शनिवारी सकाळी भरणार होती पण साईलीलेचे प्रधान संपादक व रिसिव्हरसाहेब, श्री. का. सी. पाठक हे काही महत्वाच्या कामात मुंबईत गुंतले होते व ते वेळीच येऊ न शकल्याने बैठकीला त्या दिवशी दुपारी चार वाजता सुरूवात झाली. सकाळच्या वेळी मंडळींनी अभिषेक कार्य करून घेतले. काही मंडळी जवळच साकोरीला जाऊन आली. साकोरीला याच सुमारास परमपूज्य श्री. गोदावरी माताजी यांनी एकसष्ठी समारंभ सुरू होता. माताजींच्या दर्शनाने अनेकांना धन्यता वाटली, संतोष वाटला. डोळे भरून त्यांचे दर्शन घेतले. शनी-वारी दुपारी भरलेल्या पहिल्या बैठकीस श्री नारायण पुरुषोत्तम उर्फ काकासाहेब अवस्थी अध्यक्ष लाभले होते व जमलेल्या प्रत्येकानी आपापला परिचय या बैठक-प्रसंगी करून दिला. सुमारे पाचच्या सुमारास श्री पाठक मुंबईहून आले, व आले तेव्हा ते वर बैठकीत हजर राहीले. तिळगूळ समारंभाचा गोड कार्यक्रम याप्रसंगी झाला.

शनिवारचा असा कार्यक्रम आटोपल्यावर रविवारी सकाळी, दि. १९ रोजी संमेलनाच्या खऱ्याखुऱ्या कार्यक्रमास सुरवात झाली. "साईलीलेचे आजचे स्वरूप व त्यात मला वाटणारा बदल" हा या प्रसंगी चर्चेचा मुख्य विषय होता. या बैठकीस अध्यक्ष होते पुण्याचे प्रा. श्री. नारायणराव अनंत गोरे. रिसीव्हर श्री. पाठकसाहेब या बैठकीस मुद्दाम हजर राहिले होते. मुख्य विषयावर डॉ. गव्हाणकर, श्री. पुजारी, श्री. सांडभोर, श्री. धामणकर, श्री. दोशी, श्री. सातर्डेकर, श्री. बागळे, श्री. राव, श्री. नंदवाणी, श्री. सी. डी. सामंत, श्री. देवधर, सौ. वेलिंग, सौ. सुशिलाबाई हजारे सौ. चव्हाण इ० नी मोठ्या उत्साहाने भाग घेऊन श्रीसाईलीलेबद्दलची आपापली वैयक्तिक मते त्यांनी प्रकट केली. श्री. अवस्थी यांनी आपण श्रीसाईलीलेचे दरमहा नव-नवीन वर्गणीदार करीत असल्याचे सांगितले, अध्यक्षानी या बैठकीचे संचलन आटोप-शीरपणे केले.

या कार्यक्रमानंतर बैठकीस हजर असलेल्या सर्वांना स्वतः श्री. पाठकसाहेबांनी संस्थानच्या नव्यानेच तयार होत असलेल्या भक्ती निवासाच्या सुंदर अशा इमारतीतून हिंडवून फिरवून आणले दुपारी साडेबारा वाजता हा सर्व कार्यक्रम आटोपला.

याच दिवशी दुपारी चार वाजता भरविण्यात आलेल्या बैठकीच्या सुरुवातीला श्री. भोलानाथ सबेळ यांनी बाबांच्यावर रचलेली रसाळ अशी भक्तिगीते म्हटली. या बैठकीस श्री. का. सी. पाठक अध्यक्ष होते. या प्रसंगी साईबाबांवर इंग्रजीतून सुरेख लेखन करणाऱ्या व आध्यात्मिक विषयांच्या जाणत्या पार्शी लेखिका श्रीमती मणि साहु-कार व श्री. साहुकार पाहुणे म्हणून हजर होते.

बैठकीत सुरुवातीलाच मासिकाचे प्रधान संपादक श्री. का. सी. पाठक यांनी श्रीसाईलीलेची सध्याची एकंदर परिस्थिती समोर मांडून मराठी मासिकाचा खप हजा-राच्या आसपास असून तो आणखीन वाढविण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे अत्यावश्यक

आहे असे सुचविले. श्रीसाईलीलेचे लेखक कवी–हितचिंतक इ० ची आता जबाबदारी कोणती आहे याची त्यांनी जाणीव करून दिली. मासिकाच्या मराठी आवृत्तीचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर व इंग्रजी आवृत्तीचे कार्यकारी संपादक डॉ. श्री. दि. परचुरे यांनी सकाळच्या बैठकीत चर्चिल्या गेलेल्या, पुढे माण्डलेल्या मासिक सुधारणेच्या दृष्टीने व्यक्त केल्या गेलेल्या विविध प्रश्नाना उचित पण समर्पक अशी उत्तरे दिली.

या बैठकीस श्रीमती मणी साहुकार यांनीही उत्स्फूर्त इंग्रजीतून सुरेख भाषण करून जमलेल्या लेखकवर्गाला दोन शब्द सांगितले. अखेरीस श्री. पाठक यांनी ‘ पुनरागमनायच ’ असा संदेश देऊन संमेलनाचा समारोप केला. संस्थानच्या वतीने त्यांनी स्वहस्ते प्रत्येकाला हॉलंड सरकारकडून भेटी दाखल आलेला ८५० ग्रॅम वजनाचा चीजचा एकेक डबा, उदी व सुंठवड्याच्या डब्या, बाबांचा मुखवटाकृती पाकीटात ठेवण्यालायक बिल्ला या भेटवस्तू दिल्या. डॉ. गव्हाणकरांकडून टेबलावर ठेवण्यालायक असे बाबांचे प्लॅस्टिकचे स्टॅंडचित्र भेटीदाखल देण्यात आले, संमेलनातल्या सर्व प्रतिनिधींची निवास–भोजन, चहाकॉफी इ. ची सारी व्यवस्था संस्थानने विनामूल्य केली होती व त्याबद्दलचे आभार सर्वांच्या वतीने श्री. र. श्री. पुजारी यांनी केलेल्या छोट्या भाषणातून व्यक्त केले.

अशा भेटी-गाठी दरवर्षी होत रहाव्यात असाच सूर प्रत्येकाच्या तोंडून ऐकायला येत होता.

**श्रीसती गोदावरीमाताजी यांचा त्यांच्या ६१ व्या वाढदिवस समारंभानिमित्ताने मिळालेला संदेश.**

**संतांचे कार्य करून जनता जनार्दनाला सन्मार्गाला लावणे हे देश कार्यच आहे. श्रीसंतसाईबाबांच्या कृपेने आपले कार्य अखंडित चालो.**

**—सतीगोदावरी उपासनी महाराज**

साकुरी १७–१–७५

# थोर संत श्री मेहेरबाबा



आमच्या भारतात जे वंदनीय थोर संत होऊन गेले त्यामध्ये पारशी जमातीतील संत अवतार श्री मेहेरबाबा यांचा निर्देश अवश्य करावा लागेल. मेहेरबाबांचा आत्मा आज अनंतात विलीन झाला असला तरी त्यांची भक्त मंडळी त्यांची पुण्यतिथी आणि जन्मदिन प्रत्येक वर्षी मोठ्या उत्साहाने साजरी करतात.

अवतार मेहेर बाबांचा जन्म पुण्यास १८९४ साली फेब्रुवारी महिन्यात २५ तारखेस झाला. १९१४ साली म्हणजे वयाच्या १९–२० व्या वर्षी पुण्याच्या डेक्कन कॉलेजात शिक्षण घेत असतानाच बाबांना तेथल्याच एका वयोवृद्ध साध्वी योगिनीचा दर्शनलाभ झाला. त्या योगिनीच्या दर्शनामुळे बाबांच्या अंतःकरणात

अध्यात्मिक उर्मीचा उदय झाला व त्यांनी विश्वविद्यालयीन शिक्षणास रामराम ठोकला, तो अगदी कायमचाच. पुढे लौकरच " आपणासारखे करीती तात्काळ " या संत तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे त्या योगिनीच्या कृपाप्रसादाने बाबांना आत्मसाक्षात्कार झाला आणि त्यानंतर मात्र आठ ते नऊ महिने ते पूर्ण विदेही स्थितीत राहिले. त्यांना या कालात सूक्ष्म व कारण जगताचे अजिबात मानही राहिलेले नव्हते.

श्रीमेहेर बाबांना दर्शन लाभ देणाऱ्या व त्यांच्या संपूर्ण आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या योगिनी म्हणजे श्री. हजरत बाबा जान नावाच्या मुसलमान संत स्त्री योगिनी या होत. त्यांनी मेहेरबाबांच्या वडिलांना सल्ला दिला की मेहेरबाबांना विदेही अवस्थेत असतानाच शिरडी येथे भगवान श्रीसाईबाबांच्या दर्शनास पाठवावे. त्याचप्रमाणे मेहेरबाबा श्रीसाईनाथांच्या दर्शनास गेले असता तिथे सद्गुरु बाबांनी त्यांना सांगितले, 'तुझे गुरु ब्राह्मण आहेत' म्हणून मेहेरबाबा शिरडी येथे पाच सहा महिने राहिले, बाबांचा व त्यांचा हाच काय तो संबंध आला.

१९२४ साली मेहेरबाबांनी अहमदनगर जवळच्या अरणगाव या गावी 'मेहराबाद कॉलनी' नावाची वसाहत स्थापन केली, ता, १० जुलै १९२५ पासून त्यांनी मौन धारण केले, व ते त्यांनी दिर्घकालपर्यंत आचरणात आणले. परंतु असे असले तरी त्यांच्या लोकसेवेत मुळींच खंड पडला नाही. त्यांचे मेहराश्रमातील अस्पृश्योद्धाराचे व शाळेचे कार्य खरोखरीच आदर्शभूत असेच होते. यानंतर जनसेवेकरिता व आध्यात्मिक कार्याकरिता त्यांनी भारतातील निरनिराळ्या ठिकाणी प्रवास केले आणि आपले कार्य व प्रचार जोरात सुरू ठेवला.

१९३१ च्या जुलै महिन्यात अवतार मेहेरबाबा इंग्लंडला गेले व तेथून ते पुढे अमेरिकेला जाऊन तिथे एक महिना राहून परत भारतात आले. १९३२ साली त्यांनी युरोप, चीन येथेही प्रवास केला. १९३३ साली काही पाश्चात्य भक्तमंडळी भारतात आली व ती सर्व बाबांच्या सहवासात काही दिवस घालवून परत गेली. नंतर बाबा त्याच वर्षी इटलीत दोनदा जावून आले व १९३४ साली पण ते पुन्हा युरोपच्या दौऱ्यावर गेले, व चीनमार्गे १९३५ च्या आरंभी भारतात परतले.

नंतर १९३६ च्या आक्टोबर पर्यंत ते पूर्णपणे एकांतवासात होते. यापैकी काही काळ त्यांनी अबू पर्वताच्या पहाडावर व काही काळ मेहेराबाद व राहुरी येथे ईश्वर भक्ती चिंतनात घालविला. येथे त्यांनी परमेश्वर भक्तीत मग्न असलेल्या लोकांच्याकरिता एक नवीनच आश्रम उघडला. आत्मज्ञानाच्या ओढीमुळे होणाऱ्या आनंदात धुंद असल्यामुळे या आश्रमातील काही लोक देहभानावर पूर्णपणे नाहीत असेच म्हणावयास हवे.

राहुरी आश्रमाप्रमाणेच बाबांनी पाश्चात्य भक्तमंडळींच्यासाठी नाशिकला एक

आश्रम काढला. ह्या आश्रमात बाबांच्या सान्निध्यात रहाण्याची अनेक युरोपियनांची इच्छा होती. परंतु बाबांचे जागतिक कार्यांत उपयोगी पडणाऱ्या लोकांनीच येथे येणे इष्ट असल्यामुळे कुणी यायचे हे ठरविण्यासाठी बाबा ऑक्टोबर महिन्यात पुन्हा इंग्लंडला गेले. बाबांच्या विचारसरणीचे महत्त्व जाणून काही अमेरिकन व युरोपियन भक्त मंडळी पुढे लौकरच नाशिकला येऊन पोचली. १९१७ मध्ये श्री मेहेरबाबांचा जो जन्म दिवस नाशिकला साजरा करण्यात आला त्यात अखिल भारतातल्या त्यांच्या शिष्य मंडळीप्रमाणेच पाश्चात्य शिष्यमंडळीनीही मोठ्या उत्साहाने त्यात भाग घेतला होता. त्याप्रसंगी निरनिराळ्या धर्मांचे, संस्कृतीचे व देशाचे लोक तिथे गोळा झाले होते. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यात कोणत्याही प्रकारचा भेदभाव दिसून येत नव्हता. प्रत्येकाच्या अंतःकरणात अखंड अभेदावस्थेत रहाणाऱ्या गुरुमूर्तीचा प्रवेश झालेला असल्याने सर्वांच्या वृत्ती मोठ्या प्रेमाने व आदराने तल्लीन झाल्या व अखिल मानवजातीस नवजीवन देऊन ऐक्य प्रस्थापित करणारा विश्वधर्म वर्धमान स्थितीत दिसला.

सन १९२५ मध्ये बाबांनी मौन धारण केले. त्यावेळेपासून त्यांच्याजवळ आंग्ल वर्णमाला छापलेली एक लहान फळी होती. त्या फळीवरील अक्षरे बोटाने दाखवून बाबा आपले विचार व्यक्त करीत असत. बाबांच्या सहवासात मुमुक्षूंचे शंका निरसन होऊन त्यांचे मन तर खरोखरीत समाधान पावत असे पण त्याशिवाय त्यांच्या दिव्यप्रेमाच्या अनुभवामुळे त्यांच्या अंतःकरणातही शांति स्फूर्ति व नवोत्साह उत्पन्न होत असे. ● श्रीसाईनंद


## श्रीसाईनाथ रोजनिशी

शके १८९७ ( १९७५-७६ )

येत्या गुढीपाडव्याच्या दिवशी इंग्रजी व मराठीत थाटात प्रकाशित होणार.

श्रीसाईबाबांचे शिलाखंडावर अधिष्ठित तिरंगी मनोहर फ्रेम करण्यालायक छायाचित्र.

श्रीबाबांचे संक्षिप्त चरित्र, श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीत काय काय पहाल श्रीबाबांचे समकालीन संत व त्यांची माहिती. ठिकठिकाणाहून शिर्डीत जाण्याचे मार्ग

श्रीसाईसमाजांचे संपूर्ण पत्ते. श्रीबाबांचे बोल, शिर्डीतील प्रमुख उत्सव, बाबांच्या आरत्या, समाधि मंदिर, द्वारकामाई, गुरूपादुकास्थान इ. ची आर्ट पेपर वरील छायाचित्रे, आकर्षक वेष्टन, संग्राह्य माहिती.

# क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे

● लेखक : डॉ. शां. ना. टिपणीस

समर्थ रामदासांचे ' मनाचे श्लोक ' ज्याला माहीत नाहीत, असा माणूस महाराष्ट्रात शोधून सापडणे कठीण. ' मनाचे श्लोक ' हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा आहे, ' मनाचे श्लोकात ' भारतीय तत्त्वज्ञानाचे सार साठवले आहे. त्यातील वरील प्रसिद्ध उक्ति आहे. या काव्यपंक्तीतून समर्थांनी जगास क्रियायोगाचा संदेश दिला आहे. नुसते शब्दपांडित्य करीत राहाण्यापेक्षा माणसाने क्रियाशील असावे असा या वचनाचा साधा व सरळ अर्थ आहे,

बोले तैसा चाले । त्याची वंदावीं पाऊले ॥

या तुकोबांच्या उक्तीमधून हाच अर्थ ध्वनित झाला आहे.

' विद्वान् सर्वत्र पूज्यते् ' ही म्हण जरी एका अर्थाने खरी असली, तरी विद्वत्तेलाहि मर्यादा आहेत. तत्त्वज्ञान अंगात प्रत्यक्ष बाणल्याखेरीज नुसते शब्दपांडित्य करणे अगदी निरर्थक व कुचकामी आहे, हेच तत्त्व समर्थांसारख्या संतांनी आपल्या वचनांमधून सुचित केले आहे. तत्त्वज्ञानाची शुष्क चर्चा व शब्दपांडित्य करण्यापेक्षा त्यातील उदात्ततत्त्वे व तेजस्वी विचार जीवनात प्रत्यक्ष आचरणात आणण्याचा बल करावा, हाच सर्व साधुसंतांच्या शिकवणुकीचा मतितार्थ आहे.

श्री गोंदवलेकर महाराज म्हणतात, " नुसते ग्रंथ वाचीत बसू नये. ते कृतीत आणण्याचा प्रयत्न करावा, भाराभार वाचले आणि कृति केली नाही तर काय उपयोग ? साखरेच्या गोडपणाबद्दल तासनतास निरुपणे करण्यापेक्षा एक चिमूटभर साखर तोंडात टाकली असता खरा आनंद मिळतो.

श्री उपासनी महाराज उपदेश करतात, " नुसते पोथी–पंडित बनू नका, अनुभव-पंडित बना, पोथ्या ऐकल्याप्रमाणे कृती करा. लायब्ररीच्या लायब्ररी वाचली व नुसती पुस्तके संग्रही ठेवली तर काय उपयोग ? त्याप्रमाणे कृती केली पाहिजे. नाही तर

भाराभार वाचले ग्रंथ । परि न कळे तयाचा अर्थ ।
न सुचे आत्मखुणेचा पंथ । उपजे जंव पुनः पुनः ॥

श्रीसत्यसाईबाबा सांगतात, " ग्रंथ वाचून त्याप्रमाणे आचरणात आणा, औषधांची नुसती यादी वाचून व्याधी बरी होणार नाही. त्यासाठी प्रत्यक्ष औषध पोटात गेले पाहिजे.

तात्पर्य काय की, एकाद्या तत्त्वाची केवळ बौद्धिक चर्चा करण्यापेक्षा ते तत्त्व आचरणात आणणे अधिक महत्त्वाचे, मोलाचे आणि अगत्याचे आहे.

एका वेदांती पंडिताची पुराणी कथा आहे. एकदा त्याची एकुलती एक कन्या मृत्युमुखी पडली, तेव्हा तो मोठ्याने आक्रोश करू लागला. हे ऐकून त्याच्या घरावरून जाणारा इसम थबकला आणि त्याने विचारले, " महाराज, आपण नेहमी आपल्या प्रवचनातून सांगता की, हे सर्व जग मिथ्या आहे, नुसती माया आहे, त्यात गुरफटू नका. असे असताना आपण एवढे शोकाकुल झाला, हे कसे ? " त्यावर त्यांनी तत्काळ उत्तर दिले की, " बाबारे, हे ब्रह्मज्ञान सांगायला फार सोपे आहे, परंतु आचरणात आणण्यास अत्यंत अवघड आहे. "

तात्पर्य काय की, असले कोरडे शब्दपांडित्य काही उपयोगाचे नाही,

शेगावच्या गजानन महाराजांच्या चरित्रातील अशीच एक कथा प्रसिद्ध आहे. त्यांची कीर्ति ऐकून एकदा एक विद्वान गृहस्थ त्यांच्या भेटीस आला. अहंकाराने तो पछाडलेला होता. महाराजांची योग्यता न जाणता त्याच्याशी बरोबरीच्या नात्याने तो बोलू लागला. " ब्रह्मसत्य, जगन्मिथ्या" वगैरे ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी तो पांडित्यपूर्ण शब्दात सांगू लागला, त्याची घमेंड जिरविण्याच्या उद्देशाने महाराजांनी योगसामर्थ्याने अग्नि प्रज्वलित केला. त्याचबरोबर ते ज्या बाजेवर बसले होते, तिने एकाएकी पेट घेतला. व त्याच्या ज्वाला भडकू लागल्या, ते पाहून त्या पंडिताची तर भीतीने गाळणच उडाली, व त्याने तेथून पोबारा केला. महाराज मात्र स्थितप्रज्ञासारखे शांतपणे बसून राहिले. थोड्याच वेळात अग्नि आपोआप शांत झाल्यावर महाराजांनी पंडितास पृच्छा केली, " आपण एवढा वेळ परब्रह्माच्या स्वरूपाचे अगदी रसभरित वर्णन करीत होता मग आगीचा थोडासा भडका उडताच एवढे घाबरलात कशासाठी ? " यावर तो विद्वान गृहस्थ काय उत्तर देणार ? मनात बिचारा खजिल झाला.

गुलाबराव महाराजांच्या चरित्रातील अशाच एका प्रसंगाचे स्मरण होते. काशीचा एक गाढा विद्वान एकदा गुलाबराव महाराजांबरोबर वाद घालण्याच्या ईर्ष्येने त्यांच्याकडे आला. त्याला वाटले, हा खेड्यात राहणारा कुणबाऊ माणूस आणि त्यातून आंधळा हा माझ्याशी काय वाद घालणार ? जेव्हा प्रत्यक्ष वादास सुरुवात झाली, तेव्हा तो नेहमीच्या आढ्यतेने बोलू लागला व वेगवेगळ्या ग्रंथांवरील भाष्यांचे उल्लेख करू लागला. पण जेव्हा गुलाबराव महाराज त्यातील उतारेच्या उतारे धडाधडा म्हणून दाखवू लागले व कोणत्या पानावर कोणता मजकूर आहे हे सांगू लागले, तेव्हा त्याचा अहंकार गळून पडला.

स्वामी शिवानंद हे ऋषिकेश येथें एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सत्पुरुष होऊन गेले. एकदा त्यांच्या भेटीसाठी एक ' डी लिट ' झालेले प्रोफेसर आले. स्वामीजींची भेट झाल्यावर त्यांनीं प्रश्न केला, " सविकल्प आणि निर्विकल्प समाधी यामध्ये फरक काय ? " स्वामीजी त्या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजी दुसऱ्याच गोष्टी बोलत बसले. व त्यांच्या खाण्या-पिण्याची चवकशी करू लागले, त्यांचे शिष्यहि स्वामीजींकडे

नुसते पहात राहिले, एवढ्यात लांबूनच त्या प्रोफेसर महाशयांची बायको त्यांच्यावर विजेसारखी कडाडली, " काय करता इतका वेळ तिकडे ? मी केव्हाची मोटारमध्ये बसून वाट पहात आहे, " प्रोफेसर महाशयांचे उत्तर ऐकून घेण्याच्या आधीच ती पुढे सरसावली आणि सर्वांदेखत त्यांचा हात पकडून त्यांना घेऊन गेली. ते गेल्यावर स्वामीजी नुसते हसले व म्हणाले, " समजलेत का ? मी गप्प कशासाठी राहिलो तेव्हा गृहस्थ बायकोचा एवढा गुलाम आहे, आणि 'सविकल्प समाधि' आणि 'निर्विकल्प समाधि' यातील फरक मला विचारीत आहे. याच्यासारख्याला मी काय समजावून सांगणार कपाळ ? "

या गोष्टीचें तात्पर्य काय, की तत्त्वज्ञान ही पोकळ वादावादीची बाब नव्हे, जीवनात त्याची अनुभूति घेतली पाहिजे. साक्षात्काराचे ते शास्त्र आहे.

माझ्या आयुष्यातील एका प्रसंगाची मला येथे आठवण होते. अदमासे १५–२० वर्षें झाली असतील त्या गोष्टीला. बिहारमध्ये मी माझ्या स्नेहाकडे गेलो होतो. श्री गणेशोत्सवाचे ते दिवस होते. म्हणून बरीच महाराष्ट्रीय मण्डळी एकत्र जमली होती. त्याप्रसंगी उपस्थित असलेले विज्ञानाचे एक प्रोफेसर उपहासाने बोलत होते, " ज्ञानेश्वरीची पारायण करणं हा मूर्खांचा व रिकामटेकड्या लोकांचा धंदा आहे झालं. त्यातील साऱ्या कल्पना निव्वळ खुळचटपणाच्या आहेत. " त्या तोण्डाळ माणसाच्या नादी कोण लागणार ?

थोड्या वेळाने मंडळीची पांगापांग झाली, व हे विद्वान प्रोफेसरदेखील घाईघाईत बाहेर पडले. एवढ्यात पावसाची एक छोटीशी सर आली. त्यावेळीं त्यांची जी त्रेधा उडाली, ती काही विचारूच नका ! त्याचक्षणी माझ्या मनात एक विचार विजेसारखा लखलकन चमकून गेला की, कुठे आपल्या योगसामर्थ्याने जड भिंत चालवणारे योगेश्वर ज्ञानेश्वर आणि कुठे पावसाच्या चार थेंबासरशी मातीच्या ढेकळासारखे विरघळणारे आजकालचे हे प्रोफेश्वर !

खरोखर, आत्मज्ञान हे सागरासारखे अथांग आहे. त्यापुढे विद्वत्ता ही छोट्याशा डबक्याप्रमाणे आहे. कुठे तो ब्रह्मविद्येचा ऐरावत, आणि कुठे ही विद्वत्तेची अडेल तट्टाणी ! साक्षात्कारसंपन्न संतपुरुषाची विद्वानाने बरोबरी करू पहाणे म्हणजे आपल्या तेजाने आकाशात तळपणाऱ्या सूर्याची अंधारात लुकलुकणाऱ्या काजव्यांनी बरोबरी करण्यासारखे खुळचटपणाचे, वेडगळपणाचे आणि आचरटपणाचे आहे.

साईभक्तांची श्रद्धास्थाने – ६

# वरळीचे श्रीसाईनाथ मंदिर

● सदानंद चेंदवणकर



श्रीमोहितेबाबा

मुंबईमध्ये वरळी या नावाचा एक विभाग आहे. वल्लभभाई पटेल स्टेडियम, विविध औषधे निर्माण करणारी ग्लॅक्सो कंपनी, पोदार आयुर्वेदीय महाविद्यालय व रुग्णालय, दूरचित्रवाणी केंद्र, सरकारी दुधयोजनेचे कार्यालय, मराठा दैनिकाची कचेरी इत्यादीमुळे हा सारा विभाग मोठा गजबजलेला असतो. याच विभागात शिमिटाच्या मोठमोठ्या चाळी आहेत. त्यांना बी. डी. डी. चाळी असे म्हणतात. या चाळी प्रामुख्याने जांबोरी मैदानाच्या सभोवतालीने आहेत. या मैदानास अलीकडे गांधी मैदान असे म्हणतात. या मैदानाच्या उत्तरेस लागूनच ज्या चाळी आहेत त्यापैकी चाळ क्रमांक २१ व ३० यामधील जागेत एक लहानसे मंदिर पण आहे, हे मंदिर "श्रीसाईनाथ मंदिर" या नावाने ओळखले जाते, या विभागातले साईबाबांचे हेच एकमेव मंदिर असल्याने येथील सारे साईभक्त येथेच श्रीबाबांचे दर्शनास येत-जात

असतात. या मंदिराला मूर्तस्वरूप येण्यासाठी ज्या पुण्यशील पुरुषाचे श्रम खर्ची पडलेले आहेत त्या सत्पुरुषाचे नाव आहे मोहिते बाबा.

मोहितेबाबांचे संपूर्ण नाव गुणाजी देवजी मोहिते. ते रत्नागिरी जिल्ह्यातल्या खोपी गावचे. १९४८ पासून मोहितेबाबा या वरळी भागात वावरत आहेत. त्यापूर्वी ते सैन्यात नोकरीच्या निमित्ताने होते. पहिले महायुद्ध त्यांनी प्रत्यक्ष पाहिले आहे. युद्ध कामकाजातील नोकरीत असताना त्यांनी इराण, बगदाद, पॅलेस्टाईन, ग्रीस, ऑस्ट्रेलिया हे देश पाहिलेले आहेत व तिथे त्यांनी कामगिरी पण केली आहे. १९४७ साली ते लढाईतून मुक्त झाले. सैन्यातून सुटका झाल्यावर योगायोगाने त्यांचा संत श्रीगाडगेबाबांचे एक शिष्य श्री पांडुरंग महाराज यांचेशी परिचय झाला. पांडुरंगमहाराजांनी मोहितेबाबांना गुरुमंत्र व शुभआशिर्वाद दिला व याबरोबरच आध्यात्मिक जीवनाची ओळख करून दिली आणि अशा प्रकारे मोहितेबाबांच्या एका नूतन व उज्वल अशा आयुष्याला सुरुवात झाली.

सैन्यातून मुक्त झाल्यावर मोहितेबाबा साईभक्त बनले असेच म्हणावयास हवे. बाबा आपल्या एका भक्ताबरोबर शिर्डीस गेले होते. तिथे ते एकदा एकटेच लेंडीबागेत हिंडत असताना तेथल्या पिंपळवृक्षाखाली एक साधुपुरुष ध्यानस्थ स्थितीत बसलेले त्यांना दिसले. त्यांनी मोहितेबाबांच्या मस्तकावर हात ठेवून त्यांना शुभआशीर्वाद दिला. काहीवेळाने मोहितेबाबा आपल्या त्या भक्ताला घेऊन पुन्हा त्या साधु पुरुषाचे दर्शनास गेले. पण त्यांना त्या साधुपुरुषाचा थांगपत्ताही लागला नाही. पण नवलाची गोष्ट मोहितेबाबा पुन्हा एकटेच लेंडी बागेत हिंडायला गेले. तो काय आश्चर्य! त्या साधुपुरुषाचे त्यांना पुन्हा दर्शन झाले. लेंडीबागेत आपल्याला एकट्यालाच सुआशीर्वाद आणि दर्शन दिलेली ही व्यक्ती म्हणजे खुद्द श्रीसाईबाबाच होत अशी मोहिते बाबांची श्रद्धा आहे.

बाबा मुंबईला परतल्यावर त्यांनी आपला काही वर्षांचा काळ ग्लॅक्सो कंपनीच्या पाठीमागे असलेल्या पिंपळ वृक्षाखाली व काही काळ वरळीच्या स्मशानात ध्यानस्थ अवस्थेत घालविला. सततचे चिंतन त्यांनी केले व यामुळेच की काय श्रीसाईबाबांनी त्यांना वेळोवेळी दृष्टांत दिले. अशाच मिळालेल्या एका दृष्टांतानुसार त्यांनी वरळीच्या २१ व ३० क्रमांकाच्या चाळीच्या मधल्या भागात श्रीसाईबाबांची द्वारकामाईत असलेली जी तसविर आहे त्यासारखीच एक तसबिर आणून ती तिथे ठेवून तिची ते श्रद्धापूर्वक पूजाअर्चा करू लागले. सुरुवातीला मंदिराची लहानशी सुद्धा इमारत नसल्यामुळे थंडीपावसात बाबांची खूपच आबाळ व गैरसोय झाली. पण पुढे पुढे तेथील रहिवाशांनी त्यांना सहकार्य देण्याचे ठरविले.

मोहितेबाबांनी तेथल्या आसपासच्या रहिवाशांच्या आर्थिक मदतीने एक लहा-



श्रीमोहितेबाबांच्या मंदिरातील श्रीसाईमूर्ती

नसे देऊळ बांधले १९६२ साली ते मंदिर पूर्ण झाले. या मंदिरात पुढे बाबांनी १९६९ ला श्रीसाईबाबांची एक सुंदर संगमरवरी मूर्ति आणून बसविली. ही मूर्ति बसविण्याचा समारंभ कै. श्री भाऊसाहेब हिरे यांचे चिरंजीव श्री. व्यंकटराव हिरे यांचे शुभहस्ते पार पडला होता. मंदिरातील ही मूर्ती पावणेतीन फूट उंचीची आहे, व ती एका उंच अशा चौथऱ्यावर बसविण्यात आलेली आहे हा चबुतरा सरस्वती शिर्के यांनी दिलेल्या देणगीतून करण्यात आलेला आहे. मोहितेबाबा एका वेळी माधुकरी मागून आपला उदरनिर्वाह करीत असत पण आता ते स्वहस्ते मंदिरातच बाबांचेसाठी नैवेद्य तयार करतात व मग तो आपण स्वतः भक्षण करतात. मोहिते बाबांच्या मंदिरातील श्रीसाईची मूर्ती वलसाडहून तयार करवून आणलेली आहे. मूर्ती जवळच त्रिशूळ, चिमटा असून दोन्ही बाजूस समया सतत तेवत असतात. मंदिराच्या दालनात सुमारे पाऊणशे माणसे एकावेळी बसू शकतात.

या मोहिते बाबांच्या मंदिरात श्रीसाईबाबांची पूजा अर्चा, नैवेद्य, आरती इ. सोपस्कार रोजच्या रोज नियमाने होत असतात. गुढीपाडवा, रामनवमी, व्यासपौर्णिमा व विजयादशमी हे सणही अतीव उत्साहाने साजरे केले जातात. रामनवमीला श्रीसाईच्या नावाने भंडारा होतो व सकाळपासून संध्याकाळपर्यंत हजारो साईभक्त बाबांचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतात. मंदिरात साजरे होणाऱ्या या उत्सवाला स्थानिक रहिवाशी व काही तरूण मंडळी यांचे सहकार्य बाबांना नेहमीच या कामी होत असते. सुभाष पार्टे, हवालदार, गावडे, अरुण साळवी, बाळू मसूरकर इ. मंडळींची नावे सांगायचीच झाली तर सांगता येतील. एल. आय. सी.च्या एका शाखेचे मॅनेजर श्री. चंद्रकांत दामोदर सामंत यांचा सल्ला व बहुमोल मार्गदर्शन मोहिते बाबांना वेळोवेळी लाभत आलेले आहे. या मंदिराची आता वाढ व विकास करावयाचा आहे व त्यासाठी आणखीन आर्थिक सहाय्य व तरुणांच्या मदतीचा हातभार लागणे आवश्यक आहे असे बाबांचे सांगणे आहे.

या मंदिरात रोज सायंकाळी सात वाजता होणारी बाबांची आरती मोठी पहाण्यासारखी व ऐकण्यासारखी असते. श्रीसाईनंदाच्या सर्वांच्या सर्व आरत्या अस्खलित शद्बात व एकसूराने मोठीच काय पण लहान लहान मुलेही म्हणतात व हे दृश्य पाहून मन भारावून जाते, या छोट्यांना एव्हापासूनच साईप्रेमाची व भक्तीमार्गाची दीक्षा देऊन मोहिते बाबांनी त्यांच्यावर खरोखरीच चांगले संस्कार केले आहेत, त्यात वाद नाही, प्रत्येक गुरुवार तर येथला पर्वणीचा दिवस असतो.

आज मोहिते बाबांचे वय सत्तरीच्या आसपास असावे पण या वयातही त्यांची साईभक्ती जाज्वल्य आहे, कोणत्याही शाळा कॉलेजात न गेलेल्या व लौकिक दृष्ट्या नावापुरती अक्षर ओळख असलेल्या या महान साधूचे कार्य खरोखरीच प्रशंसनीय असे आहे. मी काहीही करीत नाही साईबाबाच येथे सारे काही करतात मी फक्त

त्यांच्या नावाने येथे गरीबांची सेवा करतो. गरीबाची सेवा म्हणजेच परमेश्वराची सेवा व तिच साईची पण सेवा अशी मोहिते बाबांची दृढ श्रद्धा आहे; व ही सेवा आपण हयातभर करीत रहाणार आहोत असे मोहिते बाबा सांगतात.

मोहिते बाबा प्राणीमात्रावर पण दया करतात. यंदाच्या नाताळच्या आदल्या दिवशी म्हणजे २४ डिसेंबर रोजी एक गाय मंदिराच्या समोर येऊन मृत पावली. बाबांनी ती जिथे मृत झाली तिथेच एक गोमुख करून बसविले आहे. आश्चर्य असे की हे गोमुख बसविल्यावर काही गायी येथे येतात व ते गोमुख चाटतात व संतोष पावतात. बाबांची ही अशी करणी आहे. आज वरळी भागात श्रीमोहिते बाबा हे तेथल्या वस्तीत एक मोठे भावभक्तीचे व त्यांचे श्रीसाई मंदिर श्रद्धेचे स्थान होऊन बसले आहे. श्रीसाईबाबांनी मोहिते बाबांना दिर्घायुरारोग्य द्यावे हीच श्रीसाईचरणी प्रार्थना.

## श्री. साईलीला मार्च १९७५ अंकात.

(१) तुकारामबीज निमित्य संत तुकाराम महाराज हा वाचनीय लेख—
(२) महाशिवरात्रीच्या पर्वासंबंधाने खास लेख—
(३) श्रीसाईभक्तांची श्रद्धास्थाने या लेखमालेत, शिवपुरी येथील श्रीसाई-मंदिर हा सचित्र लेख—ले. सी. डी. सामंत.
(४) भेटीगाठी ह्या सदरात सुविख्यात साहित्यिका डॉ. सौ. चारुशीला गुप्ते यांची श्रीसाईभक्ती—
(५) 'श्रीसाईनाथ व सोळा आकडा' हा श्री. भुजबळ यांचा लेख.
(६) सौ. पार्वतीबाई भिडे यांचा साईकृपेचा अनुभव.
(७) होरालंकार श्री. देवधर यांची ज्योतिषविषयक चालू लेखमाला.
(८) श्री. र. श्री. पुजारी यांची साईनाथ चरित्रमाला—
आणि—

सौ. सुशिलाबाई हजारे, सौ. शहाणे, सौ. माधुरी कुळकर्णी, श्रीराम आठवले रघुनाथराव सांडभोर, उद्धव भावसार, डी. बी. पोतनीस, शाम जुवळे, अ. स. सबनीस, चित्रकार सदाशिवराव काळे, इ.च्या भावमधुर कविता.

याशिवाय

लेखक—कवी प्रथम स्नेहसंमेलनाची चित्रे.

पृष्ठसंख्या ४८,..............................मूल्यांक फक्त ६० पैसे

*—X—*

# प्रचिति

• सौ. उषा प्रभाकर मुळे

मंदिराच्या पायऱ्या चढून वरती गेले. साईबाबांची भव्य मूर्ति दृष्टीस पडली. मंदिर भक्तांनी फुलून गेले होते. साईबाबांच्या मूर्तिसमोर हात जोडून उभी होते. उप-वर मुलीच्या लग्नासाठी साईबाबाना आळवत होते. योग जुळून येत नव्हते. आम्ही सर्वजण त्रासलो होतो. कंटाळले होतो. अविरत प्रयत्न करत होतो. मी उठले प्रदक्षिणा घालताना समाधीच्या मागील बाजूस डोकं टेकवलं. साईबाबांची मनोमन प्रार्थना केली. अन् क्षणार्धात कोणत्यातरी अनामिक सुगंधाने भारले गेले. मनाचे अणुरेणू त्या अनामिक सुगंधाचे आकंठ प्राशन करू लागले. केवळ दोन क्षणच ! तिथे सुगंधित फुले नव्हती. अत्तर नव्हते. मग मनाला उल्हसित करणारा तो सुगंध कोठून आला होता ? कल्पनेतही न सामावलेले सत्य इतकं सुंदर असू शकतं ?

घरी आले. मुलीचे लग्न ठरत असल्याचे पत्र वाटच पहात होते. आघाशा-सारखे पत्र वाचले. बाबांच्या कृपेमुळेच हे घडलं होतं. पण…… मनात कुठेतरी खोल्वर तडा गेला. :मुलगी नास्तिक होती. देवाचं अस्तित्व न मानणारी होती. जिच्यासाठी मी साईबाबांकडे धाव घेतली होती ती देवाचे अस्तित्वच मानायला तयार नव्हती. तिने बाबांच्या दर्शनाला यावे, अभिषेक करावा असे मनातून फार वाटत होते. पण माझा त्या वाटण्याला काय अर्थ होता ? ह्याच विचारात झोपी गेले. मध्यरात्री जाग आली, उठून बसले अन् काय आश्चर्य, त्या अनामिक सुगंधाने खोली भारली गेली, बाबांनी प्रचिती दाखवली होती, ते पाठीशी होते, माझ्यावर प्रसन्न झाले होते,

काही दिवसानी मुलगी शिर्डीस आली, मी न सांगता मंदिरात चलण्याचा आग्रह धरू लागली, अभिषेक करीन म्हणाली, मनात मी आश्चर्य करीत होते, देवाला न मानणारी ही साईबाबांना कशी मानू लागली होती, का ह्यामागे बाबांनीच तिला स्फूर्ति दिली होती ? अभिषेकाची तयारी करून मंदिरात गेलो, गर्दी वाढतच होती, नंबर यायला अवकाश होता म्हणून बाहेर येऊन उभे राहिलो, अन् विजेचा शॉक बसल्यागत चंदन ओरडली, गर्दीत तिचे पाकीट हरवले होते. मला धक्काच बसला. त्यातील पैशाचे मोल माझ्या दृष्टीस शून्य होते. पण पाकिट हरवले ही गोष्टच माझ्या मनाला बेचैन करणारी होती. ती अभीषेक करायचे टाळेल का ? का, आता कोठे तुझे साईबाबा, म्हणून मला हिणवेल ? ह्या आणि अशाच विचारानी मनात चलबिचल सुरू झाली. क्षणार्धात गर्दीतून वाट काढत ती येत होती. तिच्या हातात पाकीट होते. त्यात पैसे जसेच्या तसे होते. जीव खाली पडला माझ्याबरोबरीने तिचे पण मस्तक बाबांच्या चरणावर वंदन करण्यासाठी झुकले.

• • •

# आमचे श्री साई बाबा व त्यांची कृपा

— दिनकर डी. सपकाळ ग्वाल्हेर

शिरडीचे साईबाबा! हे नाव सन् १९४८ साली मुंबईला जाताना गाडीत ऐकले, पण दर्शन मात्र झाले नाही. बालपणापासून साधूसंतांच्या गोष्टीची आवड असल्यामुळे श्री बाबांच्या प्रति मनात फारच हळहळ वाटे की श्री बाबांच्या शिरडीचे दर्शन केव्हा होईल? योग आल्याशिवाय गोष्टी घडत नसतात ते प्रकार माझ्याबाबतीत घडले! असो! मुंबईत असाच भटकत दादरच्या बाजारातून जात असताना एका पेन सुधारण्याच्या दुकानात श्रीसाईबाबांचा फोटो दिसला ते माझे प्रथम दर्शन, फोटोकडे बघत राहावे हे विचार मनातून सारखे येत असल्यामुळे मी अर्धा तास सतत तेथे उभा होतो. त्याचवेळी दुकानदाराने विचारले का कशाला उभा आहे? मी त्याला विचारले हेच का शिरडीचे साईबाबा? त्याने उत्तर दिले होय! मनापासून बाबांना नमस्कार केला, घरी आलो, काही केल्याने मुंबईत मन लागेना त्यामुळे परत ग्वाल्हेरला आलो!

ग्वाल्हेरला आल्यानंतर त्याच वर्षी धर्मयुगमध्ये श्रीसाईबाबांचा वृतांत फोटो सह प्रकाशित झाला ते वाचून श्रीसाईबाबांच्या प्रति मनात प्रगाढ प्रेम उत्पन्न झाले. दररोज पूजा करण्याचा बेत केला, त्यात फोटो प्राप्तीचा पत्ता ताडदेव बुक डेपोचा होता त्याला पैसे पाठवून साईबाबांचा फोटो मागवून घेतला. फोटो आल्यावर फ्रेम केला, हार, अगरबत्ती अर्पण करून श्रीसाईबाबांना नमस्कार केला व दररोज नियमित पूजा करण्याचा बेत केला. परंतु त्याचवेळी राजनैतिक चळवळीत भाग घेतल्यामुळे सर्व नियमभंग झाले, त्यानंतर काही वर्षे इकडून तिकडे भटकून काढली.

सन् १९५५ साली लग्न झाले. एका जागी स्थिर झालो, लग्नानंतर ४–५ वर्षे फारच कष्टाने काढली त्याचवेळी श्रीसाईबाबांची पुन्हा आठवण आली. घरात असलेला बाबांचा फोटो लावून मागे झालेल्या सर्व चुका माफ करण्याची विनंती केली! हाक बाबांनी ऐकली १९६० साली विद्युत विभागात कायमची नोकरी लावून दिली. हे मात्र अद्याप विसरलो नाही व पुढेही विसरणार नाही, तेव्हापासून श्री बाबांची पूजा नियमित दररोज करीत आहे!

शिरडीला जाऊन श्रींच्या दर्शनासाठी जाण्याचा बेत बरेच वर्षे करीत होतो. परंतु बाबांच्या कृपेवाचून ते घडणे शक्य होते का?

अखेर १९६५ साली श्रींच्या कृपेने शिरडीस जाण्याचा योग आला. मी माझी पत्नी, दोन मुले, दोन मुली ग्वाल्हेरहून निघालो त्या दिवशी ट्रेनमध्ये भयंकर गर्दी, गाडीत जागा मिळेना ! कसे तरी झाशी भोगीत बसलो सर्वांना चिन्ता कसे होणार? बाबांच्या कृपेने झाशीत माझा एक मित्र भेटला. त्यानी ट्र टायरमध्ये आम्हा सर्वांना बसवून दिले, आरामशीर रात्री १॥ ला मनमाडला पोहचलो.

मनमाडला उतरून तिथे हॉटेलमध्ये थांबून सकाळी शिरडीस जाण्याचा बेत होता, एका पोर्टरबरोबर सबंध हॉटेल फिरलो पण जागा मात्र सापडली नाही, नंतर त्या पोर्टरने आम्हाला सल्ला दिला की पहाटे ४ ला कोपरगावला ट्रेन जाते. त्याने कोपरगावला जाऊन मग शिरडीस जावे ! स्टेशनवर परत आलो. ट्रेन निघणार होती, त्या पोर्टरने एका डब्यात चढवून दिले, तिकिट काढण्याचीसुद्धा वेळ नव्हती, पोर्टरला पैसे विचारले. त्याने फक्त दोन रुपये घेतले ते फारच आश्चर्य ! त्याने मात्र बजावून सांगितले, श्रीबाबांच्या पुढे माझा एक नमस्कार अवश्य करा ! गाडीत एक वृद्ध व्यक्ती भेटली त्यांनी सहज विचारले, शिरडीला जाता ? उत्तर दिले होय ! त्यांनी सांगितले तिकिट मात्र काढले नाही. त्यांनी लगेच आश्वासन दिले घाबरू नका मी व्यवस्था करतो. कोपरगावला ते आमच्याबरोबर उतरले. गेटवर त्यांनी टी. सी. ला सांगितले हे माझे पाहुणे आहेत त्यानी आम्हाला बाहेर जाऊ दिले, एस. टी. मध्ये ही भयंकर गर्दी पण कंडक्टरला सांगून आम्हाला अगोदर बसवून दिले ! एस. टी.तून खाली आलो :पण ते वृद्ध काही सापडले नाहीत ते फारच आश्चर्य तेव्हा श्रीबाबांचे स्मरण केले व मनात विचार केला जणू बाबाच शिरडीला येणाऱ्या प्रत्येक भक्ताला मदत करतात की माझा भक्त सुखरूप शिरडीला आला पाहिजे !

शिरडीला चार दिवस राहून घरी परतलो, त्यानंतर दोनवेळा शिरडीला जाऊन आलो, लॉटरीचे तिकिट खरेदी करण्याचा नाद लागला. एकदा मनात आले बाबा ! आता शिरडीस येईन तर अँबेसडर कारमध्ये, योग असा की सन १९७० मध्ये यूनियनतर्फे एका मीटिंगमध्ये भाग घेण्यास कोरबा येथे गेलो. माझ्याबरोबर गेलेले दोन मित्र मागे लागले की येथून शिरडीला जावे. बेत ठरला आणि श्री बाबांच्या कृपेने मनमाड पर्यंत प्रवास सुखरूप पार पडला. रात्री २॥ला मनमाडला आलो स्टेशनहून एस. टी. स्थानकावर गेलो तेथे एस. टी.ची वाट पाहत होतो त्याचवेळी एक नवीन एम्बेसडर कार पूना जाणाऱ्या उतारूंना शोधीत होती आम्ही त्याला भेटलो व शिरडीस नेता का ? विचारले त्याने आम्हा तीघाना व आणि एक यात्रीला गाडीत घेतले ! सकाळी ५ च्या सुमारास शिरडीला आलो गाडीतून पाय ठेवला, डोक्यात प्रकाश पडल्यासारखा झाला व लगेच आठवडा संपला हे काय ? शिरडीला आलास तर कारमध्ये ! बाबांनी भक्ताची अट अशा

रीतीने पूर्ण केली ह्याबद्दल शंका करण्याचे स्थान आहे का ? नाही ! म्हणून श्रीसाईबाबांचे स्मरण करून जे कार्य कराल ते निर्विघ्नरूपाने पार; हे बाबांचे वैशिष्ट्य आहे !

माझी पत्नि व मुले नियमाने बाबांची दररोज पूजा करतात त्यामुळे घरात आनंदाचे वातावरण आहे !

अशीच कृपा सर्व भक्तांवर राहावी हीच बाबांच्या चरणी विनम्र प्रार्थना आहे ! —

—×—

श्रीसाईसच्चरित्राचे आधारे लवकरच प्रकाशित होणार,

**संतचूडामणि भगवान श्रीसाईबाबा**

लेखक

श्री. का. सी. पाठक, रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी

आणि

श्री. सदानंद चेंदवणकर कार्यकारी संपादक श्रीसाईलीला

# सुखी जीवनाची चिंतनिका

टीप : देही आरोग्य नांदते ।
भाग्य नाही त्यापरते ॥
हे गृहीत धरूनच या ठिकाणी फक्त
मनःस्वास्थ्याचाच विचार केला आहे.

१ सुखदुःखाच्या उत्पत्तीचे खरे स्थान मन हेच आहे. या मनाला जो समाधानी ठेवू शकतो तो सुखाने राहू शकतो. म्हणूनच समर्थांनी मनालाच उपदेश केला आहे. इतरही साधुसंतांनी म्हटलेले आहे "मन करारे प्रसन्न"

२ काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे मनाचे सहा मोठे रोग आहेत. या रोगांपासून तुम्ही आपले मन ज्या प्रमाणात मुक्त ठेवाल, त्याप्रमाणात तुमचे जीवन कमी अधिक सुखी होईल.

३ आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार सर्व सामर्थ्यानिशी करा, पण ज्यावेळी आपली शक्ती–युक्ती तोकडीच पडते, अशा वेळी मात्र मग ती ईश्वरेच्छा समजून, "ठेविले अनंते तैसेचि रहावे, चित्ती असो द्यावे समाधान" या व्रताचे आचरण करावे.

४ आपल्या आशा, आकांक्षा इतकेच नाहीतर, महत्त्वाकांक्षा सुद्धा आपल्या आवाक्यातल्याच असाव्यात. बेडूक कितीही फुगला तरी तो काही बैला एवढा मोठा कधीच होणार नाही.

५ मन नेहमी उद्योगरत ठेवा. म्हणजे असे की, आपल्या आवडीचा विषय कोणता याचा शोध घेऊन, रिकामा वेळ आपल्या छंदात व्यतीत करा. लक्षात ठेवा–रिकाम्या मनात सैतान वास करतो.

६ आनंद हा चिवडा खाण्यात नसून, चिवडा खाण्यामुळे त्या बाबतीत आपली वासनातृप्ती झाली, आणि आपले मन शांत झाले त्या मनःशांतीत सुख असते.

७ काल जे झाले त्याचा शोक करू नये, उद्या काय होणार याची चिंता करू नये, आजचा दिवस मात्र आपले प्राप्त कर्तव्य आनंदात करावे. दुकानदाराकडे 'आज रोख, उद्या उधार' ही जशी पाटी असते, तशीच ही पाटी आहे.

[पान २९ वर पहा]

# श्री साईनाथ

## (श्रीसद्गुरू साईमहाराज ललित-चरित्र)

• र. श्री. पुजारी, पुणे •

### १९. सर्वांना सर्व देणारा एक तो मालिक रे ! अल्लामिया !

मशिदीत आज असा काय प्रकार घडला न कळे ! कारण तात्याबा आणि शामराव तेथून जे बाहेर पडले ते जवळ जवळ तणतणतच ! कोणाला तरी दूषणे देतच !

माणसाने शांतपणा धारण करावा, थोडे गोडीगुलाबीने घ्यावे या गोष्टी दुसऱ्याना शिकवायला सोप्या. फारच सोप्या. पण स्वतःवर प्रसंग आल्यानंतर ज्याचे त्यानेच देवाला स्मरून सांगावे की त्याने तरी आपले डोके अशा वेळी शांत ठेवले असते का !

मशिदीपासून थोडे अंतर चालून जाईपर्यंत घडल्या प्रकाराला फारशी वाचा फुटली नाही. दोघेही त्या अप्रिय गोष्टीबाबत फारसे बोलले नाहीत. पण तात्याबांचा स्वभाव उतावळा. तोंड मिटून गप्प बसणे त्यांच्या स्वभावाला सहन होईना. कोंडलेली वाफ बाहेर पडावी तसे ते बोलू लागले. फार मागच्या गोष्टीही उकरून काढू लागले—

मास्तर, आता प्रसंग आला, अगदी गळ्याशीच आले म्हणून बोलतो. मी अगदी लहान असल्यापासून बघतो, बाबांचे सगळे हे असेच ! बिनहिशेबी ! बिन-व्यवहारी ! कुणीही चोराने यावे आणि याना लुबाडावे ! हे त्याला काही बोलणार नाहीत ! काही म्हणणार नाहीत ! मी काही म्हणालो तर ठरलेले उत्तर, " तात्याबा, पोरा ! अरे, कोण कोणाला काय देतो ! सर्वांना सर्व देणारा एक तो मालिक रे ! अल्लामियाँ ! "

मी माझ्या डोळ्यानी बघितलेली गोष्ट. तुम्हीही ती बघितली असेल. फार पूर्वी मशिदीपुढील अंगण झाडायला ती एक झाडणारी यायची. फार चोरटी ! अंगण झाडायचे निमित्त करून जाता जाता कुंडीतील दहा बारा भाकरी पळवायची बाबांच्या डोळ्यादेखत पळवायची ! वर हसायची !

मला तिचा असा संताप यायचा ! तर बाबा मलाच काय म्हणायचे, " तात्या, अभी सुनो ! घर के बच्चेंको खिलाने ले जाती, उसमें चोरी क्या ! खाने दो बेचारे बच्चेंको ! "

भाकरींची गोष्ट एक राहू दे. कुणाच्याही मुखातच जाणार. पण झोपेचे काय! झोपेच्या वेळी कोणी आरडाओरडा करू लागले
तर तो सहन कोण करणार? त्याला लाथा घालून हाकलूनच देणार की?

पण बाबांचे सगळेच जगाच्या उलटे! आयते खाऊन रेड्यासारखा माजलेला तो रोहिला येथे आला. बाबांनी त्याला मशिदीत आपल्याजवळ ठेवून घेतला. दिवस असो की रात्र असो, तो रोहिला कुराणातील कलमे अशा टिपेच्या आवाजाने पढायचा की सगळ्या गावाचे डोके त्या कटकटीने भणभणे! अगदी फुटून जायची वेळ येई! तरी बाबांचे डोके शांत! म्हणायचे, "अरे, तो मनापासून देवाचे म्हणतो, त्यात कटकट कसली! अशा गोष्टींना कटकट म्हणू नये!"

बाबांची अशी फूस! त्यामुळेच तो बेफाम झाला. गावातील लोकांना वाटेल ते टाकून बोलू लागला. सगळा गाव यामुळे चिडला. त्याला मारायला टपला. पण बाबांनीच त्याला पाठीशी घातल्यावर त्याचे कोण काय करणार! दुप्पट जोराने ओरडून सर्व रात्रभर अख्या गावाला तो जागवू लागला! म्हणू लागला, "आता झोपा कसे झोपता ते!"

रोहिल्यावरून माधवरावांना त्या दांडगट नानावलीची आठवण झाली. त्याने केलेले सर्व प्रकार डोळ्यांसमोर उभे राहिले. तात्याबाना ते म्हणाले, "तो रोहिला कसला! त्याचा बाप हा नानावली घ्या! याने आपणाला काय कमी त्रास दिला गावातील पोरे जमविली, त्याना वानरांचे वेष दिले की अंगास चिखल फासून झाल्या याच्या माकडचेष्टा सुरू!

आधीच ते माकड. अंगातील ताकदीमुळे झिंगलेले. तशात बाबांची फूस. बाबांना गादीवरून अलगद उचलून, जमिनीवर ठेवून, हा राक्षस त्यांच्या जागी गादीवर बसून तक्क्यावर उताणा झाला, हे काय आश्चर्य! काहीच आश्चर्य नाही."

माधवरावांच्या एवढ्या शब्दांनी तात्याबा पुन्हा उत्तेजित झाले. कोंडाजी सुताराची बायको त्यांच्या डोळ्यांसमोर आली. मुलगी अमनी डोळ्यांसमोर आली. भाग्या डोळ्यांसमोर आला. बडेबाबा डोळ्यांसमोर आले.

तात्याबा पुन्हा संतापाने बोलू लागले. म्हणू लागले—

आपल्या गावातील लोक तरी काय! ऊस गोड लागला की मुळासकट खायला सुरुवात! बाबा पैसे देतात, एवढे एकदा कळले! आता बघावे तेव्हा यांचा हात पुढे! कितीही मिळाले तरी 'नको, पुरे' असे शब्द तोंडून निघायचेच नाहीत!

सकाळची न्याहारी झाली, बाबा मशिदीत धुनीशेजारी जाऊन बसले की आलीच ती तीन वर्षांची उघडी-नागडी कोंडाजी सुताराची अमनी! मागे आई

जमली. पुढे ही छोटी पोर पोरीच्या हातात एक पत्र्याची डबी ! बाबांकडून रुपया काढण्यासाठी !

बाबांना मुलांचे वेड, एवढे एकदा ठरलेले. ती पोरं बाबांच्या मांडीवर जाऊन बसली की तिला कुरवाळून, तिचे पापे घेऊन बाबा तिला एक रुपया देणार हे ठरलेले ! मग ती आई माघार कशासाठी घेईल ? दूरवर उभे राहून त्या पोरीला दिसतील अशा आईच्या खुणा सुरूच ! त्या खुणांचा अर्थ त्या तीन वर्षांच्या लेक-रालाही आता पाठ झालेला. तो असा: रुपया मिळेपर्यंत बाबांच्या मांडीवरून हलू नको ! खाली उतरू नको !

लोभी आईची पोर लोभीच. रुपया मिळाल्याशिवाय ती पोरही बाबांना सोडणार नाही. बाबांनी प्रेमाने पोटाशी धरले तरी तिचे सर्व चित्त बाबांच्या खिशा-कडे ! रुपयाकडे ! बाबांचे लक्ष वेधण्यासाठी ती पोर बाबांचा हात धरील. बोबड्या शब्दांनी सांगेल, “ बाबा ! देना मया रुपय्या ! ”

तिचे बोबडे बोल ऐकून बाबांचे मन आणखीच उचंबळून येणारे ! खिशात हात घालून बाबा रुपया बाहेर काढणार ! खट्ट खट्ट वाजणाऱ्या तिच्या त्या पत्र्याच्या डबीत घालू देणार ! हे करताना खोटे खोटेच रागावून तिला म्हणणार “ का गे सटवे का लागतेस रोज उठून माझ्या मागे ! काय तुझ्या बाबाचे दोन चव्वल मी देणे लागतो ! रुपया रोज उठून मागतेस ती ! ”

असे असले तरी आणखी एक रुपया तिला मिळणारच !

हातातील ती खट्ट-खट्ट डबी ‘बाबा, दे ना रुपय्या’ हे बोबडे बोल लेंडीवर जात असताना वाटेत ही आशाखोर पोर पुन्हा दिसणारच ! पुन्हा रुपया मागणारच !

या तीन वर्षांच्या अमनीची गोष्ट एक सोडून देऊ ! पण तिची आई ती जमली— तिला बाबांनी रोज सहा रुपये देण्याचे कारण काय ? हिच्या बापाचे काय बाबा देणे लागतात ! पैसे काय येथे कोठे झाडाला लागतात !

तात्याबांचा रागाने लाल झालेला चेहरा पाहून शामराव पुढे काहीच बोलले नाहीत. मनाशी त्यांनी विचार केला: देणारे एकटे बाबा, घेणारे आम्ही सर्वजणच ! तो कमलावर अनंतहस्ते देण्यासाठी तर येथे येऊन बसला आहे ! मग आम्ही याचकांनी हात मागे का घ्यावा ? कशासाठी ?

दादा केळकरांना बोलावून बाबा रोज पाच रुपये त्यांच्या हातात घालतात ! त्या भाग्याला दोन रुपये, त्या सुंदरीला दोन रुपये रोज मिळतात ! ते कशाला, या तात्याबानाच बाबा रोज नाही म्हटले तरी दहा-पंधरा रुपये देतात. फकिरबाबा असतील तेथून बोलावून पंधरा ते पन्नास रुपये रोज देतात. अशा अतिउदार बाबांनी गोरगरिबांना रोज आठ रुपये न चुकता वाटले तर काय आश्चर्य ! काहीच आश्चर्य नव्हे !

शामराव असे विचारात आहेत तोच स्फोट व्हावा त्याप्रमाणे तात्याबा पुन्हा बोलले, "मास्तर, मी बोलतो म्हणून राग मानू नका. पण एक विचारतोः बडेबाबांची मनधरणी बाबांनी का करावी ? कशासाठी म्हणून करावी ? कोण हे बडेबाबा ?

मशिदीत बडेबाबांचे पान आपल्या शेजारी! डाव्या हाताला! ते रुसून पानावरून उठून गेले, तरी त्यांची मनधरणी बाबा करणार ! या 'बडेमिया'च्या हाताला धरून त्याना आपल्या शेजारी बसविणार ! त्यानी घास तोंडात घातल्यावर मगच बाबा घास तोंडात घालणार ! हे का ?

हे जेवणाखाणाचे राहू दे. भरल्या पंक्तीला कोणीही येऊन जेऊन जाऊ दे! पण मी विचारतो, या बड्या बाबांना रोज पंचावन्न रुपये बाबांनी देण्याचे कारण काय ? हे असे कोण ? यांचा अधिकार काय ? हे काय बाबांचे गुरु आहेत ? थोरले बंधू आहेत ?

सगळ्या गावाने मिळून या 'बड्या' बाबांना गावातून हाकलून दिले ! शिरडी गावच्या हद्दीत पुन्हा पाऊल टाकशील तर बघ, अशी सक्त ताकीद दिली. तरी बड्या बाबांचा पंचावन्न रुपयांचा मलिदा चालूच! त्यात एक दिवसही खंड नाही ! खंड कसा पडणार ? स्वतः बाबाच लेंडीबागेच्या किर्र झाडीत शिरून, ओढ्याच्या अलिकडून त्याना बोलावून, चोरून, रुपये त्यांच्या हातात घालणार, तर ते त्यानी का घेऊ नयेत ? लुटता येईल तितके बाबांना का लुटू नये ? लुटणारच ! **४० त्या जन्मातील नाती, देणीघेणी, उधारउसनवारी आपणास काय माहित !**

माधवराव आणि तात्याबा यांना विठ्ठलमंदिराशी दादा केळकर भेटले. काय कोणीकडे वगैरे त्यानी चौकशी केली. तिला तात्याबांकडून जे उत्तर मिळाले तेही कुत्स्यातच ! हातातील रिकामे पोते वर करून, ते दादा केळकराना दाखवित तात्या म्हणाले, " आम्ही निघालो आहो वाण्याकडे ! चार शेर डाळ आणायला ! बाबांनीच आम्हाला डाळ आणायला सांगितली ! "

चार शेर डाळ ? आज डाळीचे विशेष काम काय पडले ? भोजन घरात तर डाळीची वर्षाची तरतूद असते. तेथून डाळ आणायचे सोडून आज हे दोघे पेठेत का निघाले ? या तात्याबाच्या हातात तर एक बंदा रुपयाही दिसतो.

दादा केळकरांच्या मनातील शंका ओळखून तात्याबा बोलू लागले. म्हणाले, " मधल्या वाड्यावरून घसाघसा तो शेळ्यांचा एक कळप गेला. त्यावेळी बाबा लेंडीवरून मशिदीकडे चालले होते. कळप त्यानी पाहिला आणि त्याना भरून आले. प्रेमाने गहिवरले. "

शेळ्या-मेंढ्या पाहिल्या की बाबांना अगदी प्रेमाचे भरते येते ! रस्ता सोडून बाबा आनंदाने त्यांच्या कळपात घुसतात ! त्यातील एक दोघींना प्रेमाने पकडतात ! जो त्यांचा मालक असेल त्याला म्हणतात, " देतोस काय या दोघींना मला विकत ? काय घेशील रे या दोघींचे ? "

तो मनुष्य जी किंमत सांगेल ती किंमत बाबा लगेच चुकती करतात. तेथे जो कोणी दिसेल त्याला हाक मारून, त्या त्या शेळ्या त्याच्या स्वाधीन करून म्हणतात " जा रे, या शेळ्यांना घेऊन त्या कोंडाजी सुताराकडे. त्याला म्हणावे, या दोघींना पाळ. यांची नीट निगा राख ! "

दादा केळकरांना बाबांचा हा स्वभाव माहीत. पण शेळ्याचा आणि चार शेर डाळीचा संबंध काय हे त्याच्या ध्यानी येईना. म्हणून त्यांनी विचारले, " पण ही डाळ कोणासाठी ? "

दादांचा हा प्रश्न ऐकून तात्याबाना जणू संधी मिळाली. शेताचा बांध फुटून पाणी वाहू लागावे तसे तात्याबा बोलू लागले. म्हणाले, " ही डाळ आज खरेदी केलेल्या त्या दोन शेळ्यांसाठी ! बत्तीस रुपये देऊन विकत घेतलेल्या या शेळ्यांसाठी एक रुपयाची तरी डाळ नको ! "

बत्तीस रुपयांच्या शेळ्या ! म्हणजे सोळा–सोळा रुपयांची एक ! एवढ्या पैशात एखादा बैल विकत मिळेल. म्हैस, गाय किंवा घोडे विकत मिळतील.

दादा केळकरांनी हे आश्चर्य बोलून दाखविण्याआधीच तात्याबा म्हणाले, " शेळ्यामेंढ्यांच्या मालकानाही आता माहीत झाले आहे की बाबा शेळ्या हमखास विकत घेणार ! कितीही किंमत पडली तरी विकत घेणार ! असे गिऱ्हाईक मिळते कुठे !

पण अशा व्यवहारातही पुन्हा त्याचा दुप्पट फायदा ! कारण ही डाळ त्या शेळ्यांना खाऊ घातली की बाबांचे काम संपले. मग म्हणतील, " तात्याबा, जा. मघाशी विकत घेतलेल्या त्या शेळ्या ज्याच्या त्याला परत करून या. बिचाऱ्या मुक्या जीवांना आपण असे अडकवून ठेवणे बरे नव्हे. त्यांच्या त्यांच्या कळपातच त्या आनंदात राहातील. "

तात्याबानी केलेले हे भाकित तास दोन तासातच तंतोतंत खरे ठरले. शेळ्यांच्या त्या मालकाला संध्याकाळपर्यंत त्या शेळ्या परत मिळाल्या. वर बत्तीस रुपयांची दक्षिणाही मिळाली !

बाबांच्या या अव्यवहारी उधळेपणाबद्दल संध्याकाळी पुन्हा तात्याबा आणि शामराव बोलू लागले तेव्हा दादा केळकर शांतपणे त्याना म्हणाले, " तात्याबा,

माधवराव! दुपारच्या बाबांच्या सर्व व्यवहाराविषयी मी एकट्याने बसून विचार केला. तुमचे म्हणणे प्रथम मला पटले. पण नंतर पटले नाही. वाटले की बाबांनी जे केले तेच बरोबर आहे."

ते दोघे पहातच राहिले.

थोड्या वेळाने दादा म्हणाले, "बाबांइतके काटेकोर हिशेब ठेवणारे माणूस जगात नसेल!' 'तीन रुपये चौदा आणे' असा हिशेब त्यांनी एकदा केला की त्यात एका पैचीही चूक निघणार नाही! बाबा कोणास एक पैही अधिक किंवा उणी देणार नाहीत.

जी गोष्ट देण्याची, तीच गोष्ट घेण्याची. हिशोबाच्या बाहेर जाऊन एक कवडीसुद्धा बाबा कोणाकडून घेणार नाहीत. आपली कोणास देणारही नाहीत. दान–धर्म करायचा झाला तरी रोज आठच रुपये! आपल्या गुप्त कीर्द–खतावणीत तेवढेच रुपये ते हिशोबी धरतील. जास्त नाही की कमीही नाहीत. दानधर्माबाबत जर हा काटेकोरपणा, तर इतर व्यवहाराबाबत तो किती असेल याची कल्पना करा."

आपले म्हणणे त्या दोघाना कितपत पटले याचा कानोसा घेत दादा पुढे म्हणाले, "मद्रास इलाख्यातील एक पुरुष आणि तीन स्त्रिया असा चौघांचा भजनी मेळा बाबा येईल–जाईल त्याला पैसे वाटतात असे ऐकून येथे आला होता ना? बाबांची दिगंत कीर्ती ऐकूनच आला होता ना? पण बाबानी त्याना किती रुपये दिले?

दिडक्या, चवल्या पावल्या अधेल्या यांचा दीन, अनाथ, याचक गवई, भाट तमासगीर, हरिभक्त यांच्यावर रोज वर्षाव करणारे बाबा या नाचणाऱ्या गाणाऱ्या लोकांबाबतच इतके कृपण का झाले? इतके सुंदर भजन करूनही रुपया आठ आणे किंवा समोरील पेढेबर्फीचा एखादा तुकडा याच्या पलिकडे बाबा का गेले नाहीत?

याचे उत्तर बाबा कृपण आहेत हे नव्हे, बाबांनी त्यांच्याबाबतीत हात आखडता घेतला, हे आहे. पैशावर दृष्टी ठेवून त्यानी नाच केला हे त्याचे खरे कारण आहे.

पैशावर दृष्टी ठेवून काम करणारा नोकर कितीही चांगले काम करणारा असला तरी त्याचा उपयोग काय? कामापेक्षा पैशालाच तो महत्त्व देईल. दुसऱ्या ठिकाणी कोणी अधिक पैसे देऊ केले तर हे काम सोडून तात्काळ निघूनही जाईल."

तात्याबा आणि शामराव यांच्या मनात पुन्हा शंका आली. ती त्यानी दादाना लगेच स्पष्टपणे बोलूनही दाखविली. म्हणाले, 'बडेबाबाना बाबा जे रुपये देतात ते कशासाठी?" कोणते काम हे बडेबाबा करतात म्हणून बाबा इमानाने त्याना पंचावन्न रुपये देतात!"

दादा तात्काळ म्हणाले, 'बडेबाबाना बाबांनी कोणते काम दिले आहे ते

आपणास काय माहीत ! पण मला बाबा रोज पाच रुपये देतात; या तात्याना रोज दहा ते पंधरा रुपये देतात ते कशासाठी हे आम्हाला पुरते माहीत आहे. कारण बाबांची आज्ञाच अशी आहे की माझे फकिराचे रुपये जो कोणी नाचतमाशाला लावील. चैन-बाजीत घालवील त्याला हा फकीर कधीच सुख लागू देणार नाही. "

दादा केळकरांचे हे शब्द ऐकून तात्यांच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला आपल्या आईचे शब्द त्याना एकदम स्मरले ज्या दिवशी बाबांनी दिलेले रुपये घेऊन आनंदाने नाचत तात्याबा घरी आले त्यावेळी ती पुण्यात्मा मातोश्री म्हणाली होती, "तात्या ते रुपये तुझे नव्हते. देवाचे !"

देवाने दिलेले रुपये देवाच्या कामासाठी खर्च करावेत. त्यातील एका कव-डीलाही कोणी शिवू सुद्धा नये. उलट ते रुपये कमी पडतील तेथे आपले पदरचे पैसे भरीला घालावेत. देवाचे काम तन-मन यांच्याप्रमाणे धनानेही आपण पुढे करावे.

देव कोणाचे काही ठेऊन घेत नाही. उलट एक पटीनें नव्हे, दोन पटीने नव्हे तर शंभर पटीने आपल्याला परत देतो. आपल्या हातात पैसा देऊन आपले मन देव पहात असतो रे पोरा ! हे नीट ध्यानात ठेव.

तात्याबा मध्येच काही बोलणार तोच दादा केळकर म्हणाले, "तात्याबा, देव जसा कोणाही सोम्यागोम्याला पैसे देणार नाही, तसे कोणाही स्वार्थी माणसाचे पैसे तो देऊ लागला म्हणून घेणारही नाही. आपल्या नावासाठी आपणही येथे एक वाडा बांधावा या भावनेने पुष्कळ श्रीमंत मंडळी येथे धावली असती. पण अशा वाड्याला बाबांनी परवानगी दिली नसती. म्हणाले असतेः तुझा वाडा तुझ्या गावी बांध. येथे नको.

पण साठ्याना किंवा दीक्षिताना जी परवानगी मिळाली ती त्यांचा बेचाळीस कुळीचा इतिहास पाहून ! मगच. कारण उभा राहाणारा वाडा म्हणजे दगड, विटा, चुना किंवा लाकडे नव्हे. विलास करण्याचा हा महाल नव्हे. हा आहे एक मठ. एका संन्याशाचा मठ. तो मठ असा कुणालाही उभा करता येण्यासारखा नव्हे.

दादा केळकर एक क्षणभर थांबले. मग उठून मशिदीकडे जाता जाता म्हणाले, "या मठात कोणालाही मुक्तद्वार प्रवेश नाही. ज्याचे काही जुने लागेबांधे, त्यालाच येथे प्रवेश. वांद्रयाचे ते अत्यंत सात्त्विक, विठ्ठलभक्त, तरूण वकील श्री धुरंधर तुम्हाला आठवतात ? त्याना बाबा काय म्हणाले बरे ? बाबा त्याना म्हणालेः तुमचे-आमचे संबंध आजचे नाहीत. गेल्या साठ जन्मांचे आहेत !

बाबांशी कोणाचे किती जन्माचे संबंध, त्या त्या जन्मातील काय काय नाती, देणीघेणी, उधारउसनवारी आपणास काय माहीत ! पण हे सर्व बाबाना माहीत आहे. वेळ, पैसा, श्रम, प्रेम, भक्ती—या सर्वांचा पुरता हिशेब त्यांच्याकडे आहे. आपण मात्र त्या डोळ्यांइतकेच अज्ञ !"

**४१. बिचाऱ्याना काटेकुटे आणि झाडपाला याशिवाय आता अन्न नाही!**

संध्याकाळची वेळ. गाईगुरे गोठ्यात परतली. मशिदीत समई लागली. मंद दिसणारी धुनी पुन्हा प्रज्वलित झाली. तिच्या ज्वालांकडे पाहात, एक हात कठड्यावर टेकून तात्याबा आणि शामराव याना दुपारच्या त्या दोन शेळ्यांची कहाणी सांगू लागले. म्हणाले, " तात्याबा, शामराव ! ऐका.

माणूस एखाद्यावर प्रेम करते. त्याच्यासाठी जीव टाकते. ते उगीच नव्हे. त्याला कारण असते. जन्मोजन्मीचे ते लागेबांधे असतात.

दुपारच्या त्या दोन शेळ्या म्हणजे कोण ? माहीत आहे ? अरे, ते दोघे सख्खे भाऊ रे ! गेल्या जन्मीचे—

गेल्या जन्मी ते दोघे नेहमी माझ्याकडे येऊन बसत. त्या दोघांचा एकमेकावर किती जीव म्हणून सांगू ! एकमेकाना सोडून एकमेक तोंडात पाणीसुद्धा घालीत नसत ! मग वैर चिंतणें तर दूरच.

तात्याबा, जगात पैसा जितका चांगला, तितकाच वाईट ! तो कोणाला केव्हा भडकवील नेम नाहीं. खरे म्हणशील तर पैसाच वितुष्ट आणतो. माणूस तोडतो. भावाभावात कळ लावून हाडवैर निर्माण करून एकमेकांच्या जिवावर उठवितो.

त्या बिचाऱ्या दोघा भावांचे तसे झाले. केवळ पैशामुळे ते दोघे एकमेकांचे वैरी झाले.

थोरला भाऊ आळशी. तो झोपून दिवस काढी. धाकटा मात्र मोठा उद्योगी मेहेनती. कष्ट करून, घाम गाळून तो पैसा मिळवी. साहजिकच तो चार पैसे बाळगून राहू लागला.

याच एका कारणाकरून तो थोरला भाऊ धाकट्याचा काटा काटा करू लागला. त्याला पाण्यात पाहू लागला.

तात्याबा, मत्सर फार वाईट बरे ! मत्सर माणसाला कोणत्या थराला नेईल त्याच्या हातून कोणते दुष्ट कृत्य घडवील काय सांगावे !

तो थोरला भाऊ पुढे पुढे मत्सराने अगदी पेटला. आपल्या सख्ख्या धाकट्या भावाचा उत्कर्ष सहन न होऊन त्याचा प्राण कधी घेईन म्हणून टपला ! संधीच शोधू लागला. आणि एक दिवस काही क्षुल्लक कारणावरून खुसपट काढून हातात असलेला सोटा त्याने आपल्या धाकट्या भावाच्या डोक्यात घातला.

चिडीने माणूस चिडीला पडते. तो धाकटा भाऊ तसाच उठला. त्याने कुऱ्हाड हातात घेतली. वडील भाऊ आता दुसरा प्रहार करणार तोच धाकट्याने कुऱ्हाड त्याच्या डोक्यात घातली.

अशा रीतीने दोघांचीही डोकी फुटली. रक्त मळमळा वाहू लागले. पुढे थोडा वेळ गेला असेल नसेल, पडल्या जागीच ते दोघे निपचित झाले. बेशुद्ध झाले. आणि त्यातच त्या दोघांचा अंत झाला."

त्या शेळ्यांच्या पूर्वजन्माची ही कहाणी सांगून बाबा स्वस्थ बसले. जणू त्या संपूर्ण घटनेवर ते विचार करीत होते.

तोच माधवरावानी बाबांची चिलीम तयार केली. तात्याबानी पुढे होऊन तत्परतेने छापी भिजवून आणली. छापी लावून, चिलीम हातात धरून चांगले तीन चार झुरके घेतल्यानंतर बाबानी ती ठेऊन दिली. खांबाशी उभी केली. मग तोंडातील धूर सोडून, एकवार बाहेर पाहून बाबा पुन्हा बोलू लागले—

"तात्याबा, पाहिलेस ? होते काय आणि झाले काय ! पण असे तरी कसे म्हणावे ? देवाच्या दफ्तरी सर्व हिशेब असतो. पाप-पुण्याची नोंद असते. हातून बंधुहत्येचे पातक घडले, म्हणून या जन्मी ते दोघेही शेळ्या झाले. कोणीही, कोठेही हाकाव्यात अशा मुक्या बिचाऱ्या शेळ्या !

आज दुपारी लेंडीवरून येताना अचानक ते दोघे दृष्टीस पडले. फार वाईट वाटले. मन कळवळले, तिळतिळ तुटले. वाटले : अरेरे ! काय त्या प्रेमळ भावांची ही दशा ! बिचाऱ्याना काटेकुटे आणि झाडपाला याशिवाय आता अन्न नाही ! दुःख कोणाला बोलून दाखवावे तर तोंड नाही ! उभे आयुष्य त्या मालकाच्या तुरुंगात ! इतर शेळ्यांच्या मलमूत्राच्या नरकात !

तात्याबा, शामराव ! पैसा फार वाईट. केव्हा घात करील नेम नाही. म्हणूनच साधुसंतानी त्याला विष म्हटले आहे. तो कामापुरता घ्यावा आणि झाडून टाकावा. त्याच्या फार फंदात पडू नये."

## सुखी जीवनाची चिंता नको

**८ 'हसा आणि लठ्ठ व्हा' या म्हणीत बराचसा तथ्यांश आहे. मनुष्याने दिवसाकाठी एकदा तरी खदखदून हसले पाहिजे. मन निरोगी ठेवण्याचा हा सुलभ व्यायाम आहे.**

**९ मनुष्याला सत्तेपेक्षा अथवा संपत्तीपेक्षा अहंकाराचे अतिरेकी प्रेम असते. सुखी जीवनाचा महामंत्र असा की या अहंकाराला रामराम ठोकणे.**

संग्राहक : **बाळकृष्ण सदाशिव धामणकर**

# साईबोधामृत

## अर्वाचीन भक्त लिलामृत अ. ३१

● द. शं. टिपणीस

[ श्री संत दास गणू महाराज यांनी अर्वाचीन भक्त लिलामृत व श्री संत कथामृत असे दोन ओवीबद्ध ग्रंथ लिहिले आहेत. त्यात अलीकडे होऊन गेलेल्या अनेक संतांची चरित्रे त्यांनी सांगितली आहेत. भक्तलिलामृतातील अध्याय ३१ ते ३३ मध्ये तसेच संतकथामृतातील अ. ५७ मध्ये त्यांनी श्री साईबाबा संबंधी बरीच माहिती दिली आहे. या अध्यायातून साईसत्चरित्रात आली नाही अशी बरीच माहिती आहे. साईबाबांचा उपदेश पूर्ण कळण्यासाठी साईचरित्राबरोबर या अध्यायाचेही वाचन व्हावयास पाहिजे. श्री साईसत्चरित्राचे पठण पुष्कळ होते, पण या अध्यायाचे वाचन करणारे थोडेच साईभक्त असतील. साईबाबांचा उपदेश पूर्णपणे कळण्यासाठी या अध्यायाचे वाचन जरुर आहे. म्हणून साईभक्तांच्या माहितीसाठी मुक्त अनुवाद करीत आहे. दासगणूकृत हे चार अध्याय शिर्डी संस्थानने प्रसिद्ध केले आहेत. त्यांचा हा अनुवाद आहे. ब्रह्मज्ञानासारखा विषय शक्य तितक्या सोप्या भाषेत आणण्याचा प्रयत्न केला आहे. प्रथम भक्तलिलामृतातील अध्यायाचा विचार करू. ]

### अर्वाचीन भक्तलिलामृत, अ. ३१

प्रथम दासगणू महाराज श्री गणेशाला वंदन करून श्री शंकराची प्रार्थना करतात कीं आपल्याला दर्शन द्यावे. ते विनवतात की देवा तू महासामर्थ्यशाली व मी तुझे बालक, माझी उपेक्षा करू नकोस. जे तुला अवमानतात त्यांच्यावर तू कोपतोस. पण तुझे जे भक्त त्यांचे रक्षण करण्यात हे पार्वतीपते, तू सदैव दक्ष असतोस असं असता माझी मात्र तू उपेक्षा का करतोस ? मी पातकी म्हणून का मला भेटत नाहीस ? मी पातकी तर खराच पण तुझंच ना अज्ञानी लेकरू ? मला दुर्लक्षू नकोस. मजवर कृपा कर. यानंतर दासगणु संतासंबंधी थोडी माहिती देतात. ते म्हणतात, शंकाच नाही की ईश्वराचे भक्त कोणत्याही जातीचे असोत ते साक्षात नारायण असतात. सर्वांत जशी एकच प्राणज्योत असते, तीत भेद नसतो अथवा जसा एकच एक ईश्वर आहे तसे सर्व संत एकच असतात. त्यांच्यात पंथाभिमान नसतो. हा परका, हा जवळचा, चांगला वाईट असा दुजा भाव त्यांच्या ठायी नसतो. पूर्वी कबीर कमाल हे थोर संत होऊन गेले. त्यांच्यावर ईश्वरीकृपा झाली. त्यावेळी काय ईश्वराने त्यांच्या जातीधर्मांचा विचार करून दुजा भाव दाखविला ?

देव भावाचा भुकेला असतो. पण अशा भावाचा आज दुष्काळ आहे. भक्तासाठी तो दयाघन पांडुरंग स्वतःलाही विकायला तयार होतो. आम्हीच मात्र गंध दिसला की त्याच्या जाती पातीची चौकशी करतो. मग आम्ही अज्ञानी नव्हे तर काय ? यानंतर दासगणू मुख्य कथेस सुरवात करतात.

गंगेच्या (गोदावरी) दक्षिणेस कोपरगावापासून चार कोसावर शिर्डी नावाचे गाव आहे. एक दिवशी लोक ज्यांना बाबासाई म्हणतात ते शिर्डीत प्रगट झाले. सदैव आनंदात डुलत असणाऱ्या या साईचा ठावठिकाणा कोणास माहीत नव्हता. आपण आलात कोठून, आपले नाव गाव काय असे कोणी विचारल्यास महाराज झटकन सांगत, मेघगर्जना होऊन जसा पाऊस खाली पडतो तसे आम्ही आलो. आम्हास ठिकाण नाही. आम्ही निर्गुण कर्मबंधनामुळे आम्ही या पिंडी आलो. पिंडाला देह या म्हणतात. म्हणून आमचे नाव देही. विश्व हे आमचे गाव, ब्रह्म हा पिता व माया ही जननी, त्यांच्यामुळे हे शरीर आम्हास मिळाले. सुरवातीला लोक बाबांना वेडा फकीर समजत. एक वेडा भिकारी. लोकांचा विश्वास, निष्ठा बसणार कशी ? आपल्या कार्यासाठी त्यांचा विश्वास, निष्ठा पाहिजे. चमत्काराशिवाय लोक नमस्कार करीत. म्हणून बाबांनी आपला पहिला चमत्कार शिर्डीग्रामी घडवून आणला. शिर्डी खेडेगाव. त्यातली दुकाने कितीशी मोठी असणार ? किरकोळ विक्री करणारे वाणी. बाबांना एक शौक होता. रोज संध्याकाळी मशिदीत व देवळात दीप लावण्याचा. वाण्यांकडून ते तेल मागून आणत. पण एक दिवस वाण्यांनी तेल दिले नाही. खलास झाले असे खोटेच सांगितले. तेव्हा बाबांच्या मनात काय आले ते दासगणू सांगतात. बाबा मनात म्हणाले, “असत्य बोलायला लोकांना काहीच कसे वाटत नाही ! या असत्यामुळे नारायण दूर राहतो. लोकांचे नुकसान होते. असल्या कर्मामुळे त्यांच्या नशिबी पतन येते. जो खोटे बोलतो तो पातक्यातील पातकी होय. त्याला देव कधी भेटायचा नाही. जो सत्यवचनी आहे, त्याचा देव भुकेला असतो. जपतपादी साधने सत्यापुढे फिकी पडतात. सत्य हा आनंद आहे. मोक्षाची वाट सत्यातून जाते. असं सत्य कोणी कधीही सोडू नये. यात त्यांचे हित आहे.” जेव्हा बाबा तेलाशिवाय पणत्या पेटविण्याची तयारी करू लागले. तेव्हा लोक कुतूहलाने पाहू लागले. ते आपापसात बोलू लागले. तेलाशिवाय दिवा जळला आहे काय ? असे करणे म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे. शहाणे असं कधीच करणार नाहीत. हा फकीर म्हणजे शुद्ध वेडा व अज्ञानी आहे झालं. त्यावेळी तेथे नानासाहेब डेंगळे होते. ते म्हणाले, “अहो तुम्ही अंध व अज्ञानी आहात. उगाच निंदा करू नका. कोणाची योग्यता किती हे आपणास काय कळणार ? एक श्रीहरी जाणे. गप्प रहा, फकीर काय करतो ते तर बघा.” सगळे गुपचुप बघत राहिले. एका टमरेलात इवलेसे तेल होते. त्यात बाबांनी पाणी घातले व ते

आत्मारामास अर्पण केले पिऊन टाकले. मग पणत्यात पाणी ओतून त्यात काकडे घातले व एक एक करून दीप लावले. दिव्यांचा झगझगाट पाहून लोकांचे नेत्र दिपले. जनता म्हणजे कोकणची बोट, एकदा या बाजूस झुकणारे तर क्षणात त्या बाजूस. निंदेवरून, स्तुतिवर यायला त्यांना काय वेळ ? ते बोलू लागले, " अहो हा साधा फकीर नाही. प्रति ईश्वरच आहे. त्या शिवाय का असे होईल ? " डेंगळे तर काय बाबांचे भक्तच. त्यांनी बाबांचे पाय धरले यात नवल नाही. पण लोकही बाबांच्या चरणी लागले. वाणी म्हणू लागले, "क्षमा करा आम्हाला आम्ही अपराधी. आमच्यावर रागावू नका. तुम्ही आमचे मायबाप आहात. आम्ही तुमची लेकरे. तुम्ही कृपेचे सागर. सद्गुणाचे जणू सरोवर. तुम्ही शांतीचे मेरू. रागावू नका. आम्ही चुकलो. खोटे बोललो. क्षमा करा. पदरात घ्या आम्हाला " तेव्हा बाबा बोलले, " सांगतो ते लक्षपूर्वक ऐका. असत्य कधी बोलू नये. सदैव सत्याचे रक्षण करा. कोणाचा घातपात करू नका. पैशाचा व्यय चांगल्या कार्यात करा. माझं एवढं मानाल व तसं कराल तर तुमच्यावर नारायणाची कृपा होईल. " तेव्हा पासून शिर्डीचे लोक साईचरणी जे लागले ते कायमचे. साईबाबा हे महान योगी होते. त्याचे वर्णन करायला माझी लेखणी असमर्थ आहे. शिर्डीचा हा चमत्कार व बाबांचा उपदेश डेंगळ्यांनी अनेकाना सांगितला. या नंतर बाबांचा फळीवर निजण्याचा चमत्कार वर्णन करून दास गणू पुढे सांगतात की हळूहळू हे चमत्कार पसरत गेले व शिर्डीला बाबांच्या दर्शनास लोक येऊ लागले. बाबा नवसास पावतात म्हणून नवस होऊ लागले. फुलांमुळे मातीला, हिऱ्यामुळे कोंदणाला वा सोन्यामुळे चिंधीला महत्व येते त्याप्रमाणे बाबांमुळे शिर्डीला महत्व आले. कोणास माहीत नसलेले हे खेडे काशी समान पवित्र क्षेत्र झाले व त्याची ख्याति सगळीकडे पसरू लागली. यानंतर शिर्डीला घडलेले काही चमत्कार दासगणू सांगतात.

एके दिवशी कलेक्टरचे चिटणीस नानासाहेब चांदोरकर, वाईचे रामदास हरिदास त्यांचे मित्र बापू नगरकर व चौथे कानगावकर बाबांच्या दर्शनास आले. त्या रामदासी बुवाचे दुसरे दिवशी पहाटे नगरास हनुमंत जयंतीचे कीर्तन ठरले होते. दर्शन घेऊन जाण्याची घाई त्यांना होती. सर्वांनी दर्शन घेतले. बुवा म्हणू लागले, चला आटोपा. आता गाडी साधू, हे ऐकून बाबा बोलले भोजन करून मग तुम्ही सर्वांनी जावे, बुवांना तर घाई; ते आपल्या मित्राला म्हणाले, " चला आपण जाऊ. गाडी साधू, नानासाहेबाचे ठीक आहे. ते आहेत चिटणीस. पदरी मुबलक पैसा आहे. माझं निराळं. कीर्तन गेलं तर मला भीक मागावी लागेल. येथे राहून काय पैसा मिळणार आहे ? या साईच्या नादी कोणी लागावे ? चला. पहिलीच गाडी गाठू. " ते गेल्यावर बाबा म्हणतात, " नाना लोक किती आपमतलबी स्वार्थ साधण्या- साठी जोडीदारालाही सोडून जाण्यास कमी करीत नाहीत. अरे असा साथी करावा की जसा सुवास सुमनास सोडून जात नाही तसा आपणास कल्पांतीही सोडून जाणार

नाही. असा साथी एकन एक आहे." नंतर चांदोरकर व कानगावकर यांचे व्यवस्थित भोजन झाल्यावर बाबा म्हणाले आता तुम्ही निघा. पण घाई करू नका. आज गाडीला अवकाश आहे. आज्ञेप्रमाणे ते निघाले. स्टेशनवर आले व पहातात तो बुवा व व नगरकर दोघेही अजून तेथेच बसून राहिलेले. चांदोरकरांनी विचारले, काहो अजून एथेच ? गाडी नाही मिळाली वाटते ? नगरकर म्हणाले, "आज गाडी तीन तास उशीरा येणार आहे. चांगलं जेवण सोडलं व इथं उपाशी तळमळत बसलो आहोत. साधूचे ऐकलं नाही त्याचे हे फळ. तुम्ही भाग्यवान. साधूला मान दिलात. बरं केलत." नंतर गाडी आल्यावर सर्वजण नगरला गेले.

शिर्डीचा अप्पा कुलकर्णी यांची बाबांच्यावर मोठी निष्ठा. बाबा हे त्याचे दैवत. पण कर्मभोग कुणास चुकतो का ? ऑफीसात काही अफरातफर झाली. ती आफत आली आप्पावर. खरी की खोटी देव जाणे. पण बोभाटा झाला की अप्पा लबाड. त्याच्यावर फिर्याद होणार. अप्पा घाबरला. प्रांतसाहेबाकडून समक्ष येऊन जाब द्यावा असा हुकूम आला. भीतभीत अप्पाने बाबांच्याकडे धाव घेतली. चरणी लागून विनवू लागला, "बाबा कठीण प्रसंग आला आहे. तुम्ही त्रिकालज्ञ, तुम्ही जाणता ही आफत खरी की खोटी. तुम्ही सत्पुरुष, कालाचे शास्ते, देवा माझी अब्रू राख. माझं काही बरंवाईट झालं तर मी तुमचा भक्त म्हणून तुमचे नाव खराब होईल. तुमच्या खेरीज मी कोणाकडे जाऊ ? कुबेर जवळ असता का दारोदारी भीक मागावी ? क्षीरसागर असता का माशाने ओहळाकडे धाव घ्यावी ? तुमचे पाय हा माझा वशीला. तुम्ही मायबाप मी तुमचे अज्ञानी लेकरु. कामधेनूच्या मुलांनी दुसरीकडे स्तनपान करावे वा कल्पवृक्षाच्या फळाने काट्यात पडावे हे योग्य कां तुमचे पाय सोडून दुसरीकडे जाऊ कोठे ?" बाबाचे पाय धरून अप्पा रडू लागला. आणि बाबा ! माऊलीच ती. विरघळले अंतःकरण व म्हणाले, "प्रांतस्वारी सध्या नेवाश्यास आहे. तेथेच जगाचा शास्ता परमेश्वर मोहिनी रूपाने आहे. त्यांचेच सगुणरूप शनेश्वर. त्यांना नमस्कार करून खुशाल साहेबापुढे हजर होतो. तो तुझी राखण करील. घाबरु नकोस." अप्पाने आज्ञा मानली. प्रवरातटास जाऊन त्यांनी मोहिनी राजास वंदन केले व साहेबापुढे हजर झाले. हृदयात सारखे बाबांचे स्मरण. त्यांनी जबाब लिहून दिला. तो वाचून साहेबाची खात्री पटली की अप्पाने पैसे खाल्ले नाहीत. त्याने अप्पाना निर्दोष म्हणून सोडून दिले, अप्पाना आनंद झाला. शिर्डीकडे तोंड करून बाबांची प्रार्थना करु लागले. भक्तांच्या कामना पुरविणारे, वैराग्याचे राजे, माझी आई, साईराया तू या दिनावर कृपा केलीस व माझी अब्रू वाचवली. धन्य मी झालो. शिर्डीस आल्यावर मशिदीत जावून बाबांचे पाय धरले व घडलेले सर्व सांगितले. त्यावर बाबा बोलले, "करता करविता परमेश्वर आहे. जे घडणार नाही ते भक्तासाठी तो शारंगधर घडवून आणतो."

नारायण कृष्ण पंडसे यांची पत्नी माई मोठी भाविक होती. शिर्डीला साईबाबा

म्हणून एक मोठे संत आहेत असे तिने ऐकले होते. त्यांच्या दर्शनास जावे अशी तिला इच्छा झाली. आपली इच्छा तिने पतीस सांगितली पण पेंडशाना पटेना. ते म्हणाले, "शिर्डीमध्ये कोणी संत नाही. एक वेडापिसा मुसलमान आहे. खुळचट लोक त्याच्या नादी लागतात. त्यांनी त्याचे फुकट स्तोम माजविले आहे. त्या मुसलमानांपाशी काही नाही. खारटपणात शोधून तरी गोडी मिळेल काय? वेगडाला मानलं म्हणून ते खरोखर सोने होईल काय! माझे ऐक हा नाद सोडून दे." पत्नीला तळमळ दर्शनाची. तिला काही हे पटेना. केव्हा एकदा बाबांचे दर्शन मिळेल व मी पाया पडेन असे तिला झाले होते. पण पतीपुढे काय करणार? गप्प बसली बिचारी, पुढे पेंडसे सरकारी कामानिमित्त शिरडीस आले. एक दिवस पेंडसे ऑफिसमध्ये कामात असता माई एकटीच साईबाबांच्या दर्शनास गेली. बाबांच्या चरणावर मस्तक ठेवले. आशिर्वाद मिळाला. तिला फार समाधान वाटले. घरी आल्यावर तिने सर्व हकिगत पतीस सांगितली व म्हणाली 'उगाच निंदा करू नका. एकदा दर्शन तर घेऊन पहा. त्यात आपलं काय जातं.' पत्नीच्या आग्रहावरून पेंडसे दर्शनास गेले. त्यांना पहाताच बाबांनी धोंडा उचलला. 'येऊ नकोस येथे. आलास तर मारीन. मी हीन वेडापिसा मुसलमान. मी खारट, मी वेगड. चल हो चालता येथून. (बाबांच्या ह्या वरवरच्या रागात पेंडशाना हाकलण्याचा बाबांचा उद्देश नव्हता. तर पेंडशांच्या मनातील संशयाला हाकलण्याचा हेतू होता. म्हणून पेंडसे जे बोलले ते शब्द सांगण्याचा चमत्कार बाबांनी दाखवला व पेंडशांच्या मनातील संशय दूर केला. अशा बाबांच्या लीला पुष्कळ आहेत. त्यात असाच काही उद्देश त्यांचा असायचा.) पेंडसे चकीत झाले. आम्ही जे बोललो ते यांना कळले कसे? हा साधा फकीर नसून कोणीतरी अंतर्ज्ञानी आहे, पेंडशांच्या मनाने पलट खाल्ली, पुढे मध्यस्ती घालून पेंडशांनी बाबांचे दर्शन घेतले. आशिर्वाद मिळाला. ते बाबांच्या चरणी लागले.

एकदा ते दर्शनास गेले असता बाबा त्याना म्हणाले, "आपल्या गावात आज चोरटे आले आहेत. मोठे लबाड. त्यांचे लक्ष मुद्देमालावर असतं. आलथू-पालथू चोरीत नाहीत. वाड्याचा नीट बंदोबस्त कर. चोर मोठे बिलंदर आहेत. चोरी करताना कधी दिसत नाहीत." त्या रात्री पेंडशाना जुलाब उलट्या होऊ लागल्या. कॉलरा होता तो. पेंडसे गळीत झाले." अंग गार पडू लागले. पत्नी रडू लागली. बाबांच्याकडे धावत गेली. पाय धरले व म्हणाली, "महाराज माझे सौभाग्य मला परत द्या, उदी अंगारा द्या. पतीस उतार पडू द्या." बाबा म्हणाले, "शोक करू नकोस. अग जन्मला तो गेलाच. जन्म आणि मरण दोन्ही निराळी करता येत नाहीत. जो जन्मला नाही तो गेलेला कोणी ऐकला आहे काय? अंगावरचे वस्त्र जुने झाले वा न आवडले तर आपण ते फेकून देतोच की नाही? शरीर म्हणजे आत्म्याचे नारायणाचे स्वरूप आहे. तुझ्या पतीला मोक्ष मिळणार आहे. त्याला जाऊ दे. उगाच अंगारे धुपारे करू नकोस." असं म्हणून तिला

घरी धाडले. त्या रात्री पेंडसे स्वर्गवासी झाले. दुसऱ्या दिवशी गावात ४-५ लोकाना कॉलऱ्याची लागण झाली. गावाला लागण झाली. गावाला वाचवा म्हणून लोकांनी प्रार्थना केली, बाबा म्हणाले, 'घाबरू नका. गावातील सात माणसे जातील मग मरी आपला खेळ थांबवील. बाबांचे भाकीत खरं झालं. लोकाना आश्चर्य वाटले.

कोंड्या सुतार हा बाबांचा परम भक्त होता. बाबांचेही त्याच्यावर फार प्रेम होते. शिर्डीला त्याची थोडी शेतीवाडी होती. एक दिवस तो दुपारी बाबांच्या दर्शनास आला. बाबा म्हणाले, कोंड्या शेतावर जा. खळवाडीत मधल्या गंजीला आग लागली आहे. ती विझव. कोंड्या घाबरला. धावतच खळवाडीला गेला. पहातो तो आगबिग काही नाही. तसाच परत आला. म्हणाला, 'मला उगाच धाडलंत, बाबा, आगबिग काही नाही, उन्हानं माझे पाय मात्र पोळले.' बाबा म्हणाले, "माझी वाणी असत्य नसते. जरा मागे पहा धूर दिसतोय." पहातात तो धुराचे लोट दिसले. गंजीला गंज्या लागल्या होत्या. खळवाडी पेटली म्हणून गोंगाट झाला. वेळ दुपारची, वादळी वारा सुटलेला गंज्या पेटावयास काय उशीर? लोक घाबरले. बाबांना विनवू लागले, "बाबा, खळवाडी पेटली, आता आम्हाला अन्न कसं मिळणार? वर्षाचे श्रम फुकट गेले. अन्नावाचून मुले मरतील. चाऱ्यावाचून गुरेढोरे प्राण सोडतील. तुम्ही कृपानिधी आम्हाला काही उपाय सांगा. काहीतरी देवा करा व खळवाडी वाचवा, तुम्ही साक्षात परमेश्वर आहात. तुम्ही सर्व जाणता, आम्हाला वाचवा." बाबा द्रवले उठले, आग विझविण्यास स्वतः खळवाडीस गेले, पेटलेली गंजी पाहिली. तिच्याभोवती पाण्याची धार फिरविली लोकांना म्हणाले, "ही एवढीच पेटेल. इतराना धक्का लागणार नाही. ही अग्नीचा भाग आहे. कोणी विझवू नका." बाबा बोलले तसेच झाले. ती गंजी जळून खाक झाली. इतर गंजा सुरक्षित राहिल्या. अशी ही बाबाची अग्नीवर सत्ता. पंचभुते संतांच्या अधीन असतात, प्रत्यक्ष परमेश्वर त्यांचा शब्द खरा करतो.

संध्याकाळी मंडळी मशिदीत बाबांच्या दर्शनास जमली. नानासाहेब चांदोरकरही होते. त्यांना बाबा म्हणाले, "लोक किती मतलबी आहेत पहा. या भागचंद मारवाड्याची गंजी आज जळली. तोटा झाला म्हणून रडतोय. काही तरी करा म्हणून डोकं उठवलय माझं त्यानं. लाभ हानि ईश्वराधीन आहेत. पण लोक आंधळे. कळत नाही हें त्यांना. ते त्याला विसरतात. फायदा झाला, चांगलं झालं की आनंद करतात. तोटा नुकसान झाले की रडतात, का? माझं माझं करतात म्हणून, काय अर्थ आहे यात? हा म्हणतो गंजी माझी. ती कुठली आली या मारवाड्याची? ती आहे कडब्याची. बीजापासून तिची उत्पत्ती. भूमीने बीज धरले. मेघांनी पाणी दिले व सूर्याने ते आपल्या किरणांनी आकारास आणले. गंजीचे मालक तीन. पृथ्वी, मेघ व सूर्य. हा उगाच माझी माझी म्हणतोय. गंमत काय झाली, मालक तीन पण सूर्य बळा-

वला व गंजी अग्नीने भक्षण केली. पृथ्वी मात्र मधल्यामध्ये होरपळून निघाली, आणि तो घमेंडानंद धन, सदानकदा डरकाळ्या फोडणारा लागला चंचल चंचलेच्या पाठी, बसला रमत. त्यामुळे त्याला याची दाद नाही. सूर्याने संधि साधली व माल पळविला. स्त्रीलंपट वा मूर्ख लोकांना स्वतःची लाभ हानी कळत नाही. जगाच्या सगळ्या वस्तूंच असेच, मालक निराळे. आपण मात्र समजतो माझे. मालकाने माल नेला, हा उगाच रडत बसलाय मला त्रास देत. तू तरी सांग काही याला. ईश्वर एका हाताने देतो व दुसऱ्या हाताने नेतो. अज्ञानामुळे जीव सुखदुःखात गोते खातो." इतके बाबा बोलले व थांबले, पण माऊलीच ती. लगेच मारवाड्यास म्हणाले की जा घरी, स्वस्थ ऐस. दुसऱ्या व्यापारात फायदा होऊन नुकसान भरून येईल.

हा गोड उपदेश ऐकून सगळे भक्त आनंदीत झाले. चांदोरकरांनी बाबांचे पाय धरले आणि म्हणाले, देवा, ज्ञानसागरा करुणानिधी शरण आहे मी तुमच्या चरणी. माझं अज्ञान घालवा, मला ज्ञान द्या. देव कोण? कसा आहे? कोठे राहतो? काय केलं की तो भेटतो? हे सर्व मला समजावून द्या. जग हे नश्वर आहे. मग हा संसार करायचा तरी कशाला? सगळं सगळं मला नीट समजावून द्या. महाराज हसून बोलले बरं बरं, केव्हातरी पुढे मी सांगेन सगळं. यानंतर काही चमत्कार सांगून दासगणू हा अध्याय संपवितात.

गणेश विष्णू बेरे हे एक बाबांचे भक्त होते. शेतकी खात्यात ते जिल्हा तपासनीस होते. एकदा दर्शनासाठी ते शिर्डीला आले. बाबांना वंदन करून ते बसतात न बसतात तोच बाबा त्यांना म्हणाले, 'क्षणाचा विलंब न करता तावडतोब टांग्यातून कोपरगावला परत जा. त्यांची बाबांवर निष्ठा. त्यांनी बाबांचा शब्द मानला, टांग्यात बसून लगेच निघाले. टांगा भरधाव सोडला. त्या टांग्यामागून दुसरा एक टांगा येत होता. त्या टांग्यातील गृहस्थ बेऱ्याना म्हणाले थोडं थांबा. टांगा हळू चालवा. आम्हीही येतो बरोबर, बेऱ्यानी ते मानले नाही. हरिण गतीने गंगा ओलांडून टांगा कोपरगाव स्टेशनला पोहोचला. बेरे टांग्यातून उतरले नाहीत तोच बातमी आली की मागोमाग येणारा टांगा चोरांनी वाटेत लुटला. मार बराच पडला व वित्त लुटले. हे ऐकून माझ्या माऊलीने मला वेळेवर कसे सावध केले व वाचविले हे ध्यानात येऊन बेऱ्याना गहिंवरून आले.

हरीपंत नावाचे एक अग्निहोत्री ब्राह्मण पुण्याला राहत होते. ते अधिकारी व श्रीमंत होते. त्यांची पहिली पत्नी वारली. संतती नव्हती. दुसरे लग्न करण्याचे त्यांच्या मनात येईना. मित्रांनी लग्नाची पुष्कळ गळ घातली. धान्य शेतात पिकायचं तर विहिरीचे वा पाटाचे पाणी घेतले पाहिजे. एवढी श्रीमंती. तिला वारस पाहिजे. वगैरे सांगून समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न झाला. हरिपंताचे एकच म्हणणं. वयाला ५० वर्षे झाली. आता संततीची आशा करणे व्यर्थ आहे. मी काही

एवढा पुण्यवान नाही. तरीपण एकादा संत जर लग्न करायला सांगेल तर करीन. पुढे हरिपंत बाबांच्या दर्शनास गेले. दर्शन घेतले तेव्हा बाबा म्हणाले, "हरिबा, लौकर लग्न करून टाक. तो शूल्पाणी तुझा ऋणी आहे. तो शंकर तुला एक पुत्र देईल." मित्रांना आनंद झाला की आता हरिपंत लग्न करतील. पण साधुसंतावर आमची व्यावहारिक निष्ठा. ती तेवढीच. हरिपंत म्हणाले, जर ज्योतिषी याला अनुमोदन देईल तर करीन लग्न. मनाची गंमत ही अशी आहे. बाबासारख्यानी सांगितले तरी हरिपंताचे मन ज्योतिषाकडे धाव घेतच होते. असेच सर्वजण व्यवहारात वागतात. यानंतर हरिपंत नगरला गेले. तेथे कळले की एक प्रख्यात ज्योतिषी गावात आलेले आहेत. त्यांना पत्रिका दाखविली. ज्योतिषाचे मत अनुकूल पडले, पुढे पंतांनी विवाह केला. त्यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. हरिपंताची साईपदी निष्ठा जडली. यानंतर दासगणू साईबाबांची थोरवी गाऊन त्यांच्या चरणी वंदन करून भक्तांना सांगतात की हेच चरण तुमचे कल्याण करतील यास्तव ते सोडू नका. पुढील अध्यायातून साईबाबांचा जो उपदेश आहे तो लक्ष्यपूर्वक ऐका अशी भक्तांना विनंती करून दासगणू हा अध्याय संपवितात.

॥ श्री साईनाथार्पणं अस्तु ॥



लेखांक ६ वा

# ज्योतिषशास्त्राचा ओनामा

ले. – होरालंकार शं. बा. देवधर

## चंद्र

( १ ) जन्मकुंडलीमध्ये लग्नी चंद्र असल्यास त्याचे आरोग्य चांगले राहील. वर्ण सतेज, बांधा मध्यम व उंची कमी असेल. स्वभाव महत्वाकांक्षी, प्रवासाची आवड व मोठेपणा मिरविण्याची इच्छा दिसून येईल. यांचे व्यक्तिमत्व प्रभावी असेल. जन्मराशीची फले मागील लेखात दिलेली आहेत. ( लेखांक १ ला ) ती पाहावी.

( २ ) जन्मकुंडलीमध्ये द्वितीय स्थानी चंद्र असल्यास कुटुंब मोठे व सांपत्तिक दृष्ट्या चांगले. हा चंद्र बोलकेपणा व वक्तृत्व देतो. चंद्र–मंगळ युती स्पष्ट वक्तेपणा देते. डोळे पाणीदार असतात. वृश्चिक मकर राशीत चंद्र असेल तर डोळ्याला पीडा होईल. ( विशेषतः डावा डोळा. )

( ३ ) जन्मकुंडलीमध्ये तृतीय स्थानी चंद्र असेल तर बरीच भावंडे असतात. अनेक विषयांची आवड असते. विद्येचा व्यासंग असतो. लहान प्रवास पुष्कळ होतात. नातेवाईकांशी चांगले संबंध राहातात. स्वभाव चांगला असतो. हर्षल शनी यांची दृष्टी असल्यास मानसिक परिस्थिती बिघडते.

( ४ ) जन्मकुंडलीमध्ये चतुर्थ स्थानी चंद्र असता महत्वाचा आहे. कर्क राशीत येथे चंद्र असल्यास मातृसौख्य चांगले मिळते. आयुष्याचे शेवटचे दिवस चांगले जातात. स्त्रियांना गृहसौख्य चांगले मिळते. व त्या समाधानी वृत्तीने राहतील.

( ५ ) जन्मकुंडलीमध्ये पंचमस्थानी चंद्र असता कलाकौशल्याची आवड असते, पण गणित विषय कठीण जातो. दीर्घ मुदतीचे शिक्षण पूर्ण होत नाही. कर्क वृश्चिक मीन राशीत चंद्र शास्त्रीय विषय व मिथून, तूळ, कुंभ राशीतील चंद्र वैमानिक व हवामान या शिक्षणास चांगला.

या स्थानी कर्क, वृश्चिक, मीन राशीत पुष्कळ संतती होते. चंद्राची राहू, मंगळ, शनि या ग्रहांशी युती बालमृत्यू दर्शवितात. रेस, सट्टे वगैरे बाबतीत हा चंद्र लाभकारक आहे. व्यापारातही यश मिळते.

( ६ ) जन्मकुंडलीमध्ये षष्ठ स्थानी चंद्र असल्यास मानसिक दुर्बलता दाखवितो. भावनाप्रधानता व भित्रेपणा हे दुर्गुण असतात. आत्मविश्वास कमी. लहानपणी आजार असतात. प्रकृतीस्वास्थ्य रहात नाही. ह्या लोकांनी धंद्यात पडू

नये. नोकरीच करावी. खाण्यावर नियंत्रण ठेवावे. नाहीतर प्रकृतिस्वास्थ्य व्हाणार नाही. या ठिकाणी चंद्र मंगळाची युती असेल तर अपघाताची भीती राहील.

(७) जन्मकुंडलीमध्ये सप्तमस्थानी चंद्र असता वैवाहिक सौख्य चांगले मिळेल. विवाहाचा जोडीदार मनमिळाऊ व स्वभावाने प्रेमळ असेल. चंद्राची या ठिकाणी बुध, शुक्र, रवि, गुरु यांची युती झाल्यास वैवाहिक जीवन सुखावह होईल. चंद्र–राहू वाईट फळे देतील.

भागीदारी धंद्यामध्ये हा चंद्र लाभकारक आहे. चंद्र–मंगळ व चंद्र–शनि सप्तम स्थानी असल्यास अशा मुलींचे विवाह लवकर जमत नाहीत.

(८) जन्मकुंडलीमध्ये अष्टमस्थानी चंद्र असता हा बालारिष्ट योग आहे. हा चंद्र पापग्रहाचे दृष्टीमध्ये असता आठ वर्षांच्या आत मृत्यू येतो. दीर्घायुष्य मिळत नाही, अपघात होण्याची भीती असते. पण शुभ ग्रहाची दृष्टी असल्यास अरिष्टातून संरक्षण होते.

(९) जन्मकुंडलीमध्ये नवमस्थानी चंद्र असता हे भाग्याचे लक्षण समजावे. हा मनुष्य कीर्तीमान होतो. त्याला दीर्घप्रवास व परदेशगमन घडते. वृत्ती धार्मिक असते. परंतु मंगळाची दृष्टी असल्यास जुन्या धार्मिक समजुतींना चिकटून राहातो व धर्माविषयी कोत्या समजुती असतात. चंद्र राहू जर नवमस्थानात असतील तर तो कर्मठ असतो. चंद्र भाग्यस्थानी असता त्याची वय वर्षे तीस पासून अडतीस अखेर भाग्योदयकारक जातात.

(१०) जन्मकुंडलीमध्ये दशमस्थानी चंद्र असता सार्वजनिक कार्यात यश प्राप्त होते. त्याचे उद्योगधंदे बदलतात. बहुधा तो नोकरीच करतो. गुरुशी युती असल्यास शिक्षणखात्यात यशस्वी होतो. शनिशी युती असल्यास अपयश येते. नोकरीमध्ये मतभेद होतात. चंद्र राहू चांगले. त्यामुळे नोकरीत अधिकार प्राप्त होतो. अस्थिरता हा चंद्राचा धर्म आहे. त्यामुळे नोकरीत वारंवार बदल घडून येतात.

(११) जन्मकुंडलीमध्ये अकराव्या स्थानी चंद्र असता अनेक लोकांशी मैत्री संबंध जुळतात. चांगल्या राशीत चंद्र असल्यास विश्वासार्ह मित्र मिळतात. अकरावे स्थान हे लाभ स्थान असल्यामुळे सांपत्तिक लाभ होतात. संततीसौख्याला हा चंद्र चांगला असतो. चंद्र–शनि,–चंद्र–हर्षल, चंद्र–मंगळ या योगामुळे व्यसनी मित्र मिळतात.

(१२) जन्मकुंडलीमध्ये द्वादशस्थानी चंद्र असता थंडीच्या विकारांची पीडा होते. हिशेबीपणा व काटकसर अंगी नसल्यामुळे नेहमी आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागते. गूढशास्त्रे, मंत्रतंत्र, ज्योतिष वगैरे विषयांची आवड असते व त्यामध्ये मगती होते. मंगळ–हर्षल–शनि या पापग्रहांनी जर हा चंद्र बिघडला असेल तर कारागृहवासही भोगावा लागतो. एकंदरीत या स्थानी चंद्र चांगला नाही.

## मंगळ

( १ ) जन्मकुंडलीमध्ये लग्नी मंगळ असता मनुष्य साहसी, तापट व चळवळ्या असतो. त्याचे हातून अविचाराची कृत्ये घडतात सारासार विचार नसतो. त्याला कशातच समाधान वाटत नाही. कर्क, वृश्चिक, मीन राशीत असेल तर त्वचारोग होण्याची भीती असते. चंद्र-मंगळ हा लक्ष्मी योग समजतात. मंगळ लग्नी असता लहानपणी प्रकृती चांगली रहात नाही. हा मंगळ मेषेत असता तांबुस, डोळे कन्येत घारे, तुळेत वक्रदृष्टी व मीन राशीत दृष्टीचा असतो.

( २ ) जन्मकुंडलीमध्ये द्वितीय स्थानी मंगळ असता एकंदरीत आर्थिक दृष्टीने चांगला नाही. सावधगिरी न बाळगता पैशाचा अपव्यय करतो. चंद्र-मंगळ असता खूप पैसा मिळवितो. स्पष्टवक्तेपणा त्याच्या अंगी असतो. त्याला डोळ्याचे विकार व दृष्टीदोष होण्याचे भय असते. हे लोक खाण्यापिण्यावर जास्त खर्च करतात. धनस्थानात मंगळ असून दशमात जर रवि किंवा चंद्र असेल तर उद्योग-धंद्यात, नोकरीत चांगली प्रगति होईल. हा मंगळ जर पापग्रहाबरोबर असेल तर कुटुंबामध्ये भांडणे व कलह उत्पन्न होतील.

( ३ ) जन्मकुंडलीमध्ये तृतीयस्थानी मंगळ असता मनुष्य धाडसी व पराक्रमी होतो. कारण हे पराक्रम स्थान आहे. त्याला लढाऊवृत्ती आवडते. भावंडाचे सौख्य फारसे मिळत नाही. हट्टीपणा, हेकेखोरपणा हे दुर्गुण आढळतात. मंगळावर पापग्रहाची दृष्टी असल्यास बंधु-भगिनींचे सुख मिळणार नाही. उलट त्यांचेकडून त्रास होईल. प्रवास वारंवार करण्याची आवड असते.

(४) जन्मकुंडलीमध्ये चतुर्थ स्थानी मंगळ असता तो गृहसौख्याचे दृष्टीने चांगला नाही. येथे रवि. शनि, हर्षल असेल तर मालमत्तेला व घराला त्यापासून धोका पोहोचतो. चतुर्थस्थान हे मातेचे स्थान आहे. त्यामुळे मातृसौख्यास हा मंगळ धोका देणारा आहे. गुरू-मंगळ, चंद्र-मंगळ, शुक्र-मंगळ घर व इस्टेट यांचे बाबतीत चांगले असतात. शेतीपासून जमिनीपासून फायदा होतो. स्त्रियांच्या कुंडलीत येथे मंगळ असला तर तो सासरी दुःख देणारा असतो.

( ५ ) जन्मकुंडलीमध्ये पंचम स्थानी मंगळ असता संतती सौख्य फारच कमी लाभते. जुगार व सट्ट्याचे व्यवहारात नुकसान होईल. पुरुषांच्या कुंडलीत हा मंगळ मैदानी व मर्दानी खेळ यामध्ये प्राविण्य देईल. पण इतर विद्येच्या बाबतीत तो अडथळे निर्माण करील. वृश्चिक राशीत मंगळ असता वैद्यकीय विद्येत व शस्त्रक्रियेत यश देणारा आहे. स्त्रियांच्या कुंडलीत पंचमस्थानी हर्षल, शनि किंवा राहू-यांची युती मंगळाबरोबर असल्यास स्त्रियांना गर्भपाताची भीती राहील.

( ६ ) जन्मकुंडलीमध्ये षष्ठ स्थानी मंगळ असता तो फार चांगला असतो. तो मनुष्याला कीर्तीमान व बलवान करतो. त्याचे अंगी कर्तबगारी विशेष असते. कुटुंबात तो निष्कपटपणे राहातो. हा मंगळ मामाच्या सौख्याचा नाश करतो.

नोकरीच्या बाबतीत फार उत्तम. हाताखालच्या लोकांकडून त्याला त्रास होतो. त्याचप्रमाणे शत्रूपासून त्रास होतो. पण शत्रू टिकत नाही. षष्ठस्थानी मंगळ असता तो मनुष्य प्रकृतिची काळजी घेत नाही. त्यामुळे उष्णजन्य विकार, फोड, गळवे व साथीजन्य विकारापासून त्रास होतो. अशा मनुष्याची काम करण्याची धमक व उत्साह चांगला असतो.

(७) जन्मकुंडलीमध्ये सप्तम स्थानी मंगळ असता तो वैवाहिक सौख्याला चांगला नसतो. पुरुषांच्या कुंडलीत सप्तमस्थानी मंगळ असता पत्नीचा मृत्यू होतो, व स्त्रियांच्या कुंडलीत सप्तम स्थानी मंगळ असता पतीचा मृत्यू होतो. ही गोष्ट अनुभवात बसत नाही. तेथे शनि–मंगळ असेल तर मात्र तो विघातक आहे. राहू मंगळ असतानासुद्धा संसार सुखाचा नाश होतो. सप्तमातल्या मंगळामुळे संसारात शांतता व समाधान मिळत नाही. विवाह जुळविताना मंगळाचा प्रश्न येतो. १२, १, ४, ७, ८ ह्या स्थानी मंगळ असल्यास मुलास किंवा मुलीस मंगळ आहे असे म्हणतात ह्या मंगळाचे अति स्तोम माजविण्यात आले आहे. अनुभवावरून असे दिसते की एकटा मंगळ पति- किंवा पत्नीचा मृत्यू घडवून आणत नाही. तो मंगळ पापग्रहाचे दृष्टीत किंवा युतीत असेल तर मात्र त्याचे अनिष्ट परिणाम होतील.

[अवतार मेहेरबाबांची जयंती २५ फेब्रुवारी रोजी येते. तन्निमित्त त्यांचा एक मौलिक विचार]

—संपादक

जी शक्ति निव्वळ विचारात, बोलण्यात व लिहिण्यात खर्च होते ती रेल्वे इंजिनाच्या शिटीतून बाहेर निघून जाणाऱ्या वाफेसारखी असते. शिटी मोठा आवाज करते आणि त्यामुळे मोठी करमणूकही होते. पण ती काही इंजिन चालवू शकत नाही. शिटी कितीही वाजवली तरी इंजिन पुढे जाऊ शकणार नाही. इंजिन जर इष्ट त्या रेल्वे स्टेशनवर घेऊन जायचे असेल तर वाफेला योग्य तऱ्हेने कार्यास जुंपून अकल हुषारीने तिचा उपयोग करून घेतला पाहिजे. म्हणूनच सिद्धांतापेक्षा त्यांच्या उपयोगावर, ते सिद्धांत आचरण्यावर भर देऊन 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' हे तत्त्व प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे.

—संग्रहित

## वाऱ्यावरचे विचार : ४ श्रावण

श्रावण मास. कोणी याला रावण मास म्हणतात. सर्वात खादाड हा महिना या महिन्यात माणसे खातात. बिचकू नका. माणसे खातात म्हणजे माणसे नाना पदार्थ देवास आवडतात या निमित्याने खूप खातात. हा महिना माणसाचे खिसे खातो. एकंदरीत या महिन्यात अनेक क्षेत्रात खादाखादी चालते. श्रावण मासातील तळलेल्या पदार्थांची राणी म्हणजे अळुवडी. गोरगरीबांपासून श्रीमंतापर्यंत सर्वजण निदान एकदातरी अळुवडी करतात नि खातात. सोमवार हा या राणीचा खास दिवस. गंमत अशी की या दिवशी अळुवडी फार चवदारही लागते. सोमवारच्या कडक उपासामुळे संध्याकाळी खसखसून भूक लागते व तळल्या वडीच्या वासामुळे ती अधिक क्षुब्ध होते. कोंडा हा भुकेला मांडा ठरतो तशातली गत. सोमवार हा शंकराचा वार व शंकराला अळूवडी आवडते म्हणून तिला महत्व. सोमवार खेरीज शीतलासप्तमी, गोकुळअष्टमी व पिठोरी या दिवशीही अळुवडी लागतेच. यामुळे या महिन्यात आळवाला खप व भाव फार. आळवात आळू कल्याणी. फारच पॉप्युलर. कल्याणी आळू व्यापाऱ्यांचे कल्याण करून आपले नाव सार्थ करते. भारतीय व्यापारी संकेताप्रमाणे ऐनवेळी अळू भूमिगत होते. रावण दहा तोंडाने खाई तसा हा महिना दहा दिशांनी खातो. यामुळे खर्च दसपट वाढून खिसे हवा गेलेल्या फुग्याप्रमाणे होतात, तेल, तूप, गुळ व साखर या चतुष्ट्यांवर श्रावण महिना उभा असतो. हे चारी वाले किल्ले रोखून धरण्याचे काम मोठ्या चतुराईने व्यापारी करीत असतात. येथून पुढे आठ एक महिने धर्म कांड व्यापाऱ्यांच्या हाती असल्यामुळे त्यांच्या उदरी शनि येतो, सुट्या व खाणे यामुळे हा महिना विद्यार्थ्यांचाही आवडता आहे. या महिन्यात निसर्गही खुषीत असतो व लहरी प्रमाणे नाचत असतो. नारळी पौर्णिमेनंतर पाऊस कमी व्हावा अशी रुढी आहे. पण तरुण पिढीप्रमाणे रुढीच्या शृंखला तोडण्याचे निसर्गानेही ठरविले असावे असे दिसते. नारळी पौर्णिमेनंतर कित्येक वेळा पाऊस वाढतो नाहीतर एकदम जो भूमिगत होतो तो नेमका गणेशोत्सवाला हजर होतो. वैशाख हा जसा आपला लग्नाचा विशेष मोसम, तसा श्रावण हा कोल्ह्यांच्या लग्नाचा मोसम, कुठे तरी जंगलात कोल्ह्याचे लग्न लागते एकाच वेळी ऊन व पाऊस पाडून निसर्ग जाहीर करतो असे म्हणतात. आळीपाळीने ऊन व पाऊस शिवाशिवीचा खेळ खेळीमेळीने खेळतात या महिन्यात. उपासतापास व्रत वैकल्ये यांचा धुमधडाका या महिन्यात असतो. या कर्मकांडाचा उद्देश चित्तशुद्धीचा असला तरी पुरुषांचे खर्चामुळे व स्त्रियांचे कामामुळे चित्त प्रक्षुब्ध होऊन त्यांची शुद्धि जाते. श्रावण हा मानवी जीवनाचा आरसा आहे. जीवन खादाड स्वार्थी झालं आहे. ऊन पावसाप्रमाणे सुख दुःख आळीपाळीने जीवनात खेळत असतात. कामामुळे जीवनात माणसास त्राही भगवान करून सोडते.

— द. शं. टिपणीस

# तूच तूच हे जडो वेड

शतगुणांच्या सनया सुरावती तव आगमनें
प्रेमाची पखरण होऊनि जडली अनंत मने ॥
तुला वाहण्या, तुला सजविण्या आणू कोणती सुमनें
दुःकला दुर्गुण गळून, मी निर्मिशी तूच सुमनें ॥
सदा सर्वदा घडव मी योग तुझा या जगीं
न दुखावी प्रीती माझी तुझिया चरणाची ॥
सर्व विकल्पा देऊनि सुट्टी हात हवा प्रेमाचा
" तूच तूच " हे जडो वेड मज आशिस हाच हवा ॥
बहु दुर्गुणांचे सावट हे मन माझे वेडे
अजुन जन्म लागतील मज शुद्धविण्या हे तळे ॥
तरी जन्म घे मोक्षविण्या मज तू युगायुगांतरी
मोक्षाची माया त्यागुनि हो माता जन्मांतरी ॥

● नरेंद्र - कृष्ण

# " श्रीसाई स्मरण "

( चाल – झिलमिल सितारोंका आंगन )

साईनाथ बाबांचा लागला छंद ॥
साईनाथ चरणी मन आहे धुंद ॥
त्याचमुळे जीवनी माझ्या आनंदी आनंद ॥ ध्रु ॥
शिर्डी नगरीत दैवत माझे ॥
कीर्तीचा डंका विश्वामध्ये गाजे ॥
राहणीच त्यांची त्याजला साजे ॥
पाहूनी वैराग्य वैराग्याला लाजे ॥
दर्शनास येते बाबा डोळयासी आनंद ॥ १ ॥ साईनाथ चरणी
मन माझे त्यांच्या स्मरणांत डोले ।
साईनाथ बाबा माझ्या अंतरात बोले ॥
राजा रंक उंच नीच येथे नाही बंद ॥ २ ॥
शिर्डी नगरीत रोज दसरा दिवाळी ।
प्राण पंचारतीने भक्त बाबांना ओवाळिती ॥
निंदो वा वंदो वा कोणी करितो चहाळी ।
त्याकाच साईबाबा प्रेमाने कुरवाळी ॥
राम रहीम येशू गोविंद गोविंद ॥ ३ ॥ साई

● श्रीमती विमलादेवी

# पंढरीचा पाटील

( शिर्डीचे बाबा पांडुरंगास पंढरीचा पाटील म्हणत )

कर ठेवुनीया कटी । चंद्रभागेचिये तटी ॥
पंढरीचा जगजेठी । पाहे वैष्णवांची दाटी ॥ १ ॥

दिंड्या पताका नाचती । टाळमृदंगा संगती ॥
वाळवंटी लक्षकंठीं । उठे विठूची आरती ॥ २ ॥

वहूवाजूनीया फुले । भाव भक्तिची हो गंगा ॥
पापप्रक्षाळणीं तुझ्या । नित्य वाहे पांडुरंगा ॥ ३ ॥

देवा अक्षरे अमृत । मेळवूनी ज्ञानदेवें ॥
तुला केलें अजरामृत । दिव्य प्रज्ञेच्या प्रभावें ॥ ४ ॥

नामदेवें नाममाळा । तुझी वाहुनीया गळा ॥
कीर्तनात नाचविली । श्यामसुंदर सावळा ॥ ५ ॥

भोळ्या भक्तिला भुलुनी । वेडावला चक्रपाणी ॥
देवपण विसरूनि । रंगे जनीच्या अंगणी ॥ ६ ॥

मुळाभाजी सांवत्याची । डोंग्या चोखयाची बोली ॥
गोऱ्याकुंभाराची हांक । तुझ्या अंतरीं बिंबली ॥ ७ ॥

संत तुकयाची वाणी । एकनाथाच्या गौळणी ॥
प्रेमभक्तिनें न्हाणिला । तो हा त्रैलोक्याचा धनी ॥ ८ ॥

पंढरीचा हा पाटील । उभा भींवरेच्या तीरीं ॥
वाट पाहातो कधीचा । जाण्या संतांना सामोरी ॥ ९ ॥

— रमाकांत वि. सरमळकर

## झाले गेले जा विसरून

नाही केले साईभजन
कसे टळेल जन्म-मरण ? ॥ ध्रु० ॥

नाही बीज-ना अंकूर
व्यर्थ माझी कुरकूर
आता आलो देवा शरण ! ... १

तेल होते जैं समईत
नाही लावियली ज्योत
अंधारात चांचपडणं ! ... २

जेव्हां लागे तुझी आस
मंदावती माझे श्वास
दिसे मज रचले सरण ! ... ३

घ्या तळमळ ही पदरात
करा जन्माचा कृतार्थ
झाले गेले जा विसरून ! ... ४

— विनायक पाठक

## देई दर्शन देवा

तळमळ लागे आता जीवा
देई दर्शन लवकर देवा ॥ ध्रु० ॥

बहुत हिंडलो, मी भवताली
नाना रूपें तुझी पाहिली
परी अंतरी तुझाच् ठेवा ॥ १ ॥

वनांत हिंडता, पानोपानी
ऐकूं येती तुझीच गाणीं
भान हरपुनी करितो धावा ॥ २ ॥

सगे सोयरे, मित्र सोबती
नाम तुझे मम राहो चित्तीं
"मी"–पणाचा विसर पडावा ॥ ३ ॥

व्यापुन राहे तुझा नीलिमा
तव नामाचा अपूर्व महिमा
अमृत सिंचन करि रे देवा ॥ ४ ॥

कवि – "चेतन", डोम्बिवली (पूर्व)

# नाम मात्र प्रभुरायाचे

नाम स्मरण, नित्य करावें, पापि तरुन जाती
ध्यान मनन, अंतरिचे ज्या, त्यास मोक्ष प्राप्ती ॥ ध्रु० ॥
संत वचन ठेवा चित्तीं,
बाळगुनी श्रद्धा भक्ती,
कृपा ओघ वळवुनि घ्यावा, सिद्ध शक्ति हातीं ! १
भ्रांति नको, भगवंताची,
कृपावंत हृदयामाजी,
परम सुहृद, आत्मा अपुलॆ, नेत योग्य पंथी ! २
असो, नसो, भावहि हृदयीं
मुखी बसो, नाम सदाही
नाम मात्र, प्रभुरायाचे, करित चित्त शांती ! ३
भाव तशी भक्ति उपजे,
भक्तितुनी, मुक्ती निपजे,
संत भेट, अवचित घडते, कृपा दृष्टि गांठी ! ४
भावनिष्ठ, नाम प्रभूचे,
ज्ञान दीप, तेथ प्रकाशे,
प्रकाशांत, पुढती पुढती, श्रेष्ठ संत जाती ! ५
निःसाधन, साधन नाम
लाभ भला, लाभे राम,
नाम यज्ञ, लक्ष्मीतनया, मांडितसे साची ! ६

• लक्ष्मीतनया

# श्री साईदरबारच्या शिल्पकारास वंदन



त्रिवार वंदन तुला–प्रिय मुला त्रिवार वंदन तुला ॥
साईच्या तू दरबाराचा
शिल्पकार तू खरा ॥ प्रिय मुला ॥
नेत्राचे तू दीप लाऊनी ॥
हृदयाची छिन्नी करूनी ॥
भाव ओतीला कणाकणातुनी
आळविण्यास प्रभूवरा–त्रिवार वंदन तुला ॥ १ ॥
भाव भक्तीचे दालन करूनी
प्रेम पुष्पाची शय्या रचुनी ॥
मृदु वचनानी आळवूनीं त्याला ॥
आणिलेस मंदिरा ॥ प्रिय मुला ॥
शिल्पकार तू खरा–त्रिवार वंदन तुला ॥ २ ॥
साईचरणी करिते प्रार्थना ॥
पूर्ण करी तव सर्व कामना ॥
धावुनि येतील तुझ्या हाकेला ॥
विश्वास ठेव तू जरा, प्रिया मुला ॥
शिल्पकार तू खरा–त्रिवार वंदन तुला ॥ ३ ॥

• सई मुकुंद गर्दे

# सारथी !

तुझ्या कृपेने साई चालला रथ
या जगताचा ।
तूं परमेश्वर, मी तर पामर,
तुझिया चरणांचा ॥ ध्रु ॥
चराचरावर तुझीच सत्ता ।
तुझ्या लोचनी रवी दिव्यता ।
लोभ तुला तर आहे केवळ
भोळ्या भक्तीचा ॥ १ ॥
अखंड आहे ऋणी तुझा मी ।
सांगूं किमया कशी कुणा मी ।
झोळी असूनी खांद्यावरती
कुबेर दुनियेचा ॥ २ ॥
नाम साई हे लोभसवाणे ।
विश्वाला जो अवघ्या जाणे ।
साई नाम ते घेता होईल
नाश संकटांचा ॥ ३ ॥
राम रहीम हे तुझ्यांत दिसती ।
हिंदू मुस्लीम सारे भजती ।
तुझ्या चिंतनी सापडेल तो
पथही मोक्षाचा ॥ ४ ॥
तूं विश्वाचा आहेस तारक ।
पतितांचा तूं रे उद्धारक ।
साई नामा मधे मिळाला
अर्थ जीवनाचा ॥ ५ ॥

● जयंत भिडे

# अवतरले, साईनाथ सदनीं

मम हृदयीची भक्ति पाहुनी ।
अवतरले, साईनाथ सदनीं ॥ ध्रु ॥
फकिर वेषी मूर्ति प्रभुंची
साधी सोज्वळ सुंदर साची
प्रभा फाकली श्री तेजाची
पाहिले, रुप तयांचे लोचनीं ॥ १ ॥
आसन दिधले बसावयाला
प्रपंच पूजेचा मांडियला
देव माझा, मी पूजियला
वंदिले, वाकुनिया चरणीं ॥ २ ॥
उद – फुलांचा सुवास सुटला
साई गीतांचा निनाद घुमला
देह माझा हरखुनि गेला
वाटले, कृतार्थ मी जीवनीं ॥ ३ ॥
साई लीलामृताची प्यास
अन् भक्तिचा तिच्याच ध्यास
कधी न सुटावा हा हव्यास
गढुनि, जावे दिन-रात चिंतनीं ॥ ४ ॥

● दत्ताराम आ. बारस्कर

# शिरडी-वृत्त-डिसेंबर १९७४

या महिन्यात श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी साईभक्तांनी गर्दी फार होती. नाताळनी सुट्टी व सहलीमुळे यात्रेचे स्वरूप आले होते. काही कलाकारानी श्रींपुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :—

**कीर्तन :—** १) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी, यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली. २) सौ. इन्दूमती म. पुरंदरे पुणे. ३) ह. भ. प. गोपाळ शं. कानेटकर बीड. ४) ह.भ.प. तुकारामबुवा खु. परदेशी शिरडी. ५) हीरा र. म्हात्रे मुंबई (तबला) ६) सौ. कुसुमताई साठे, त्रिंबकेश्वर. ७) ह. भ. प. शरयुबाई रा. पाटील, पंढरपूर. ८) सौ. अनुसयाबाई नि. लांडगे, पंढरपूर ९) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिर्डी

**प्रवचन :—** १) श्री. श्रीपाद वा. खानोलकर, मुंबई. २) ह. भ. प. निवृत्तीराव पाटील, गोंदकर, शिर्डी

**गायन :—** १) श्री. अशोक, मुंबई १२ २) श्री. पुष्पराज कोष्टी, मुंबई १६. ३) श्री. अशोक म्हात्रे मुंबई १६, ४) श्री. चंद्रकात कुष्टे, मुंबई १६. ५) मिसेस सरला शर्मा, मुंबई १२. ६) अत्रान मिस्त्री मुंबई. ७) सौ. शैला सू. मोहिते दादर, मुंबई ८) सूर्यकांत मोहिते मुंबई. ९) कु. जयश्री शेजवाडकर मुंबई १२. १०) सौ. शकुंतला कृ. मयेकर मुंबई २४ ११) श्रीनाथ सेवक, शरद लोंढे इन्दूर.

श्रीदत्तजयंती :— संस्थान गवई याचे दत्तजन्म कीर्तन व रात्री श्रींचे रथाची गावातून मिरवणूक, असा सालाबादप्रमाणे कार्यक्रम झाला.

माननियांच्या भेटी :—

(१) मा. श्री. एस. व्ही. तनखीवाले, पोलीस कमिशनर पुणे.
(२) मा. श्री. सुंदरम जिल्हाधिकारी, अहमदनगर.
(३) मा. श्री. एन. के. पारेख न्यायाधिश सिटी सिव्हीलकोर्ट मुंबई.
(४) मा. श्री. शंकररावजी चव्हाण शेतकीमंत्री महाराष्ट्रराज्य मुंबई.
(५) मा. श्री. वा. वी. दलाल सेक्रेटरी लॉ. ॲण्ड ज्युडीशियरी डी. महाराष्ट्रराज्य मुंबई.

**संतांच्या भेटी :—**

(१) श्री. सखाराम महाराज अमळनेरकर, श्रींचे दर्शन घेऊन गेले.
(२) शेगावचे श्री. गजानन महाराज यांची पालखी दिंडीसह आली होती. श्रीपुरुषोत्तमराव पाटील वगैरे संत मंडळीनी श्रीसाईबाबांचे दर्शन घेतले. कोर्ट रिसीव्हर श्री. का. सी. पाटकसाहेब यांनी श्री. गजानन महाराजांच्या मूर्तीला हार घालून श्रीफळ देऊन पालखीचे स्वागत केले.
(३) हवापाणी—शिरडी येथील हवा पाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे थंडी असते.

Regd. No. MH/BYE/26

# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १–५० | ८" × १०" | रु. ०–५० |
| १०" × १४" | रु. १–०० | २½" × ३½" | रु. ०–२० |
| ४½" × ५½" | रु. ०–३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. डी. डी. नेरॉय यांच्या ब्लॉकावरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी.) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिळेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १–५० |
| २. शिळेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | ,, ,, | १–२५ |
| ३. शिळेवर बसलेले बाबा | ,, | २२.८६ × ३३.०२ | ०–५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | ,, ,, | ०–५० |
| ५. शिरडी दर्शन (६६ फोटोंचा अल्बम) | | | २–०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुं. नं. १४

मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.
४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई–३१.
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक**, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.